# अमृत कुंभ



वर्ष १८ | अंक १ | एप्रिल - मे २०२४ | मूल्य रु. १४/-



तळेगाव दाभाडे : महाशिवरात्री व महिला दिनानिमित्त श्रीमंत सरदार उमाराजे दाभाडे, यादन्यसेनिराजे यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. प्रभा



ठाणे (पूर्व) : महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात झेंडा फडकवल्यानंतर संबोधताना ब्र.कु. मीनाक्षी



येवळा : जागतिक महिला दिनानिमित्त पालकांसाठी आयोजित कार्यक्रमात ग्रुप फोटोत प्राचार्य फादर मेथ्यु, फादर ऑगस्टिन, सिस्टर हेमामी, सिस्टर वेलांगणा व ब्र.कु. नीता



फैजपूर : महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना ब्र.कु. शकुंतला, ब्र.कु. मीरा व महिला अतिथी



बुलढाणा : महाशिवरात्री निमित्त सहस्त्र ज्योतिर्लिंग झांकीचे अवलोकन करताना शिक्षण अधिकारी भ्राता अनिल अकाळ, भ्राता सागर पवार, ब्र.कु. उर्मिला व ब्र.कु. पूनम



सानपाडा, नवी मुंबई : महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना नगरसेवक भ्राता दशरथ भगत, सहाय्यक आयुक्त कल्पना सजदे, ब्र.कु. शीला, ब्र.कु. नीलम व अन्य

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृतकुंभ

## अंतरंग

वर्ष १८, अंक १. एप्रिल – मे २०२४






| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय – अंतरंगी रामराज्य | २ |
| २. | आध्यात्मिक खजिनदार : ईशुदादीजी | ४ |
| ३. | उन्नतीसाठी लबाडी करणे योग्य आहे का? | ८ |
| ४. | राजयोग म्हणजे.... | ९ |
| ५. | स्वानुभवाचे बोल | १२ |
| ६. | अलौकिक व्यक्तिमत्त्व | १६ |
| ७. | राजयोग ध्यान, तणाव व्यवस्थापनाचा प्रभावी मार्ग | १८ |
| ८. | मार सके ना कोई | २० |
| ९. | "शिवबाबा माझा पाठीराखा" (भाग – ६) | २२ |
| १०. | परीकथा (भाग – १४) | २३ |
| ११. | एक तरी दोहा अनुभवावा | २५ |
| १२. | आरोग्य रहस्य | २६ |
| १३. | प्रश्नोत्तरे (भाग – ७) | २७ |


## मुखपृष्ठाविषयी

ईश्वरी ज्ञानमार्गात 'उडती कला' असा एक शब्द अनेकदा वापरला जातो. याचा साधा सोपा अर्थ आहे – व्यर्थ विचारांपासून मुक्तता आणि त्याचबरोबर शुद्ध, सकारात्मक विचार. व्यर्थ विचारांचे ओझे बुद्धीरूपी विमान निम्न स्तरावर आणते. जसे चुकीच्या सिग्नल यंत्रणेमुळे विमानाचे अपघात होऊ शकतात तसे संस्कारांची टक्कर म्हणजे साधनेतील अपघात. हे टाळायचे असेल तर जेव्हा अशा अपघाताची शक्यता दिसते तेव्हा चाणाक्ष साधक शुद्ध विचारांच्या ऊर्जेने वर जातो म्हणजेच अपघात टाळतो. आपल्या आध्यात्मिक शक्तीची बचत करतो, जेणेकरून रंगबिरंगी फुग्याप्रमाणे जीवन आनंदीत राहते आणि मन–बुद्धी हलकी बनते हेच मुखपृष्ठाद्वारे सांगायचे आहे.

– प्रकाशिका

**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.

वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,५००/–, एका अंकाचे रु. १४/–
E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.



संपादकीय ....

# अंतरंगी रामराज्य

जानेवारी २०२४ मध्ये संपूर्ण भारत एका वेगळ्या उत्साहाने भारून गेला होता. अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या भव्य उद्घाटन सोहळ्याची सर्वत्र चर्चाही आधीपासूनच घडत होती. देशाच्या पंतप्रधानांच्या हस्ते त्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. रामायणातील वर्णनानुसार श्रीराम ज्या स्थानी गेले, त्या ठिकाणच्या मंदिरात जाऊन पंतप्रधानांनी पूजा-अर्चा केली. या सगळ्या घटनेमागे जो काही राजकीय हेतू वा रंग असेल त्याकडे आपण जाणीवपूर्वक काना-डोळा करु या. आपल्याला श्रीरामाच्या देवत्वाविषयी चर्चा करावयाची आहे.

धन्य भूमि बन पंथ पहारा।
जहँ जहँ नाथ पाऊ तुम्ह धारा।।
धन्य बिहम मृग कानन चारी।
सफल जनम भए तुम्हहि निहारी ।।

असे वर्णन तुलसीदासांनी केले आहे. त्याचा अर्थ असा आहे. श्रीरामांचे चरण जिथे जिथे पडले तो मार्ग, ती वने, तो पर्वत हे सगळे धन्य होत. त्या वनांत वावरणारे पशु-पक्षी सर्व जीवही धन्य आहेत कारण त्यांना श्रीरामांचे दर्शन घडले.

भारतातील प्रचलित वर्णनानुसार देव-देवतांचे वर्णन सर्वगुणसम्पन्न, सोळा कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, मर्यादापुरुषोत्तम आणि अहिंसा परमोधर्म असे आढळते. रामरक्षेत श्रीरामांचे वर्णन करताना बुधकौशिक ऋषी म्हणतात. 'एकैक अक्षरं पुंसां महापातक नाशनम्' म्हणजे ज्याच्या नावाच्या उच्चारानेही पापनाश होते असे ते नाम आहे. इतके महिमा मंडन असलेल्या देवतेचे केवळ वर्णन करूनच आपण तृप्त व्हायचे का? सहजच एखाद्या लहान मुलाला उपदेश करताना मोठी माणसे सांगतात, ज्यांच्याविषयीचे आदर्श बाळगतोयस त्याचे नुसते गुणगान करू नकोस त्यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न कर. उदाहरणार्थ सचिन तेंडुलकर असो. फुटबॉलपटू मेस्सी असो किंवा कुणी शास्त्रज्ञ वा प्रसिद्ध व्यक्ती असो. जे लहान मुलांना आपण सांगतो तेच मोठ्या माणसांनाही स्वत:साठी लागू नाही का? प्रचलित प्रथेनुसार भक्ती करत आलो; पण उपास्य देवतेच्या गुणांपैकी मी काही धारण करू इच्छितो असा प्रयत्न आपण करतो का? वर उल्लेखिलेल्या वर्णनांपैकी एक लक्षण विचारात घेऊया - मर्यादा पुरुषोत्तम

जीवनात अनेक ठिकाणी आपल्या वागण्या बोलण्यावर आपल्याला मर्यादा घालाव्या लागतात. कधी त्या मर्यादा समाजाने, रुढी परंपरांनी घालून दिलेल्या असतात, तर कधी कायद्याने निर्माण केलेल्या असतात. बस किंवा कुठल्याही सार्वजनिक प्रवासात मिळालेले तिकीट प्रवास संपल्यावर आपण कुठे टाकतो? कचऱ्याची पेटी शोधून त्यातच टाकतो की इतर कुठे भिरकावतो?

आजही अनेक जण रस्त्यावर थुंकताना आढळतात.

खरे पाहता या अगदीच प्राथमिक स्वरुपाच्या मर्यादा आहेत. साधकांसाठी असलेल्या मर्यादा फार व्यापक अर्थाच्या आणि तितक्याच सूक्ष्म आहेत. त्यावर नुसताच विचार नव्हे, तर स्वपरिवर्तन करणे हेच आपले ध्येय आहे. कायदा म्हणजे काय किंवा मर्यादा म्हणजे काय? मानवाकडून अपेक्षिलेली योग्य किंवा सुसंस्कृत कृती म्हणजे मर्यादा! असे मर्यादायुक्त जीवन म्हणजेच आदर्श रामराज्य!

रामराज्याची कल्पना गांधीजींना फार प्रिय होती. त्यातील अभिप्रेत अर्थ होता - पारस्परिक स्नेहाने लोकं एकमेकांशी वागावीत, मतभेद नसावेत कायद्याचा धाक जरूर असावा; पण त्यातील शिक्षेची अंमलबजावणी करण्याची वेळच येऊ नये अशी सामाजिक स्थिती गांधीजींना अपेक्षित होती. प्रत्येक माणसाच्या जीवनात, अंतरंगात एक राज्य असते. म्हणजेच आपल्या मन-बुद्धी संस्कारांसोबत आपली कर्मेन्द्रिये कार्यरत असतात.

त्याद्वारे आपण कर्म करतो. तिथे रामराज्य नांदले पाहिजे. अंतरंगात रामराज्य नांदले तर ते बाह्य जगतात आपोआपच नांदू लागेल. प्रश्न आहे अंतरंगात रामराज्य नांदणे म्हणजे काय? आणि ते कसे नांदेल?

आपण जसा विचार करतो तसे आपण बोलतो का? आणि जे बोलतो त्यानुसार कर्म करतो का? मन-वाणी-कर्म यांचा आपसांत ताळमेळ आहे का? मार्च महिना जवळ आल्यावर व्यवसाय करणारा माणूस सनदशीर मार्गाने, मिळवलेला पैसा जाहीर करून त्यावर लागू होणारा कर भरतो का? की अन्य मार्ग शोधतो? याचप्रमाणे साधकाने एखादा विचार नक्की केला तर त्यानुसार त्याचे पालन करतो का? उदा. मी अमुक वेळ ध्यानात, नामस्मरणात किंवा कुठल्याही साधनेत घालवेन असे ठरविल्यास त्या प्रमाणे आपण किती वेळ देतो हा आत्मपरीक्षणाचा मुद्दा आहे. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' हे केले तरच श्रीरामांप्रमाणे पूज्यनीय बनू शकतो. जीवनातल्या छोट्या छोट्या नियमांपासून सुरुवात करून पाहता येईल. उदा. कितीतरी वेळेस आपण सहजच एखादा शब्द बोलतो आणि तो दुसऱ्याला वर्मी बसतो किंवा कारण नसतानाही आपण खोटे बोलतो. अहंकारवश बोलतो. अहंकार हे रावणाचेच प्रतीक नव्हे का? राम किंवा रामायणातील कथांतून आपण काय घ्यायचे आहे? स्वामी विवेकानंदांना एकदा कुणीतरी प्रश्न केला - खरंच रामायणातील वर्णनानुसार घडले असेल का? म्हणजे राम-रावणाचे युद्ध झाले वगैरे - त्यावर ते म्हणाले हे वर्णन प्रतीकात्मक आहे. मनोविकारांचे चित्ररूप म्हणजे रावण, बद्धावस्थेत असलेला मनुष्य म्हणजे सीतामाई, रावणावर विजय प्राप्त करवून देणारा सीतेला मुक्त करणारा तो परमेश्वर आणि ब्रह्मज्ञानाचे वहन, आचरण करणारा तो हनुमंत. 'रमन्ते योगिन: यास्मिन् स राम: ज्यामध्ये योगिजनांचे मन रमण करते. मनाला जो रमवितो तो राम असे थोडक्यात म्हणता येईल. हाच अर्थ विवेकानंदाला अभिप्रेत असावा.

पुन्हा एकदा रामराज्याच्या विचाराकडे येऊ या. अंतरंगात रामराज्य नांदण्याकरिता काय करावे लागेल. जोपर्यंत देहबुद्धी घट्ट रुजलेली आहे. तोपर्यंत आत संघर्ष आहे. रावणाशी युद्ध आहे. जितका देहबुद्धीचा नाश (म्हणजेच रावणाचा नाश) होईल तितके रामराज्य, आंतरिक सुख स्थापित होत जाते. रावणाच्या बाबतीत एक मजेशीर वर्णन आपण वाचतो. रावणाचे एक शिर उडवले, तर त्या जागी दूसरे पुन्हा प्रकट होई. शेवटी त्याचा नाश करण्यासाठी त्याच्या नाभीवर शरसंधान केल्याने तो गारद झाला. व्यर्थ विचारांचे असेच असते. कुणी अपमानकारक बोलल्यावर आपल्या आत किती प्रकारच्या विचारांच्या जाळ्याची निर्मिती होते पहा. एकातून दूसरा, दुसऱ्यातून तिसरा असे न थांबणारे विचार म्हणजेच रावणाची तोंडे होत. अशा वेळेस हे विचार थांबवण्यासाठी ज्ञानाच्या जोडीला साधनेची बैठक हवी. ज्ञानाच्या पातळीवर विचार करू पाहता आपण म्हणतो. हे विश्वव्यापी नाटक आहे यात प्रत्येकाची एक भूमिका निश्चित आहे किंवा दुसऱ्याचे असे बोलणे म्हणजे साधकाची कसोटी आहे. परीक्षेत उत्तीर्ण झाल्यास पुढच्या वर्गात जाऊ शकतो इत्यादी. पण हे ज्ञान असूनही विचार थांबत नसतील, तर समजावे साधनेची बैठक कमकुवत आहे. साधनेतून मिळालेली शक्ती ज्ञानयुक्त विचार अमलात आणताना कामी येते. जर अशा विचारांवर विजय मिळवता येत नसेल, तर जणू काही रावणाशी आपले युद्ध सुरूच आहे हे जाणावे. स्वत:ला देह न समजता निराकार आत्मा समजणे, मी निराकार पित्याची संतान आहे याचा सखोल अभ्यास करणे हीच घनघोर साधना आहे. याद्वारेच आतल्या रावणावर विजय मिळवणे सुलभ आहे. अन्यथा रावण आपले डोके वर काढतच राहणार. हीच राजयोगाची साधना आहे.

रामायणातील वर्णनानुसार श्रीराम, रावणवध करून अयोध्येस परत आले तो दिवस म्हणजे चैत्रप्रतिपदा अर्थात गुढी पाडवा. थोडक्यात काय तर गुढीपाडवा म्हणजे विजयोत्सव.

ऐकें संन्यासी तोचि योगी। ऐसी एकवाक्यतेची जगीं।
गुढी उभविली अनेगीं। शास्त्रांतरी॥
(ज्ञाने. अ. ६, ओवी ५२)

आपल्या कर्मेन्द्रियांमध्ये एकवाक्यता येवो आणि अंतरंगात खरे रामराज्य नांदायला लागो जेणेकरून आपणही सत्त्वगुणी श्रीरामांसारखी आध्यात्मिक उंची पार करू शकू अशी शुभकामना मराठी नववर्षाच्या निमित्ताने देऊन थांबतो.

***



# आध्यात्मिक खजिनदार : ईशुदादीजी

**ब्र.कु. हेमंत, शांतिवन, आबू रोड**

शास्त्रांमधे वर्णन आहे कुबेरांना शिव व ब्रह्माचे वरदान प्राप्त होते. शिवजींनी कुबेरांच्या भक्तिमुळे प्रसन्न होऊन त्यांना अक्षय तृतीयेस अक्षय खजिना देऊन देवतांचा कोषाध्यक्ष बनवलं. असंच ब्रह्माजींनी कुबेरांना धनाची देवता बनवलं. कुबेरासारख्या अशाच एक अतिविशेष प्रभुरत्न, ज्ञानधन व स्थूलधन ह्या दोन्हीं खजिन्यांच्या प्रामाणिक ईश्वरी धन-कुबेर होत्या 'राजयोगीनी दादी ईशु जी!' दादींनी पूर्वजन्मी केलेल्या तपस्येने जणू प्रसन्न होऊन शिवपित्याने दादींना अक्षय ज्ञानरत्नांच्या खजिन्याचा मालक बनवलं. त्याचप्रमाणे ब्रह्माबाबांनी दादींना पारखून, ब्रह्मावत्सांनी अर्पण केलेल्या स्थूल धनाचा कोषाध्यक्ष बनवलं. सुरुवातीपासूनचा इतिहास अति समीपतेने पाहणाऱ्या ईशु दादी भगवत चरित्राच्या साक्षीदार आणि ब्रह्मावत्स वा ब्रह्माबाबा यातील पत्रव्यवहार सांभाळणाऱ्या एक गुप्त चित्रगुप्तही होत्या!

दादीजींचा जन्म सिंध हैद्राबाद येथे १ मे १९२८ रोजी झाला. पिता 'दयालदास थदानी' व आई 'कमला' यांनी सुंदर नाव दिलं 'ईश्वरी!' तर शिवपित्याने सदैव शांतचित्त व धीरगंभीर स्वभावामुळे अलौकिक नाव दिलं 'पूर्णशांता!' ब्रह्माबाबा प्रेमानं 'ईशु' म्हणत. दादींचं घर बाबांच्या घराशेजारी होतं. एके दिवशी दादी बाहेर निघाल्या. समोर बाबा उभे होते. त्यांना पाहता क्षणीच दादींना जणू साक्षात्कारच झाला हे साधारण मानव नसून, फार थोर, महापुरुष आहेत असे वाटले. त्यांच्या ठायी अलौकिक शक्ती वास करत आहे. दादी आई-वडिलांना म्हणाल्या, 'मी बाबां कडे जाते.' हे ऐकून दादींना त्यांचे मातपिता सत्संगात घेऊन गेले. तिथे ब्रह्माबाबांच्या चुंबकीय व्यक्तिमत्वाने आकर्षित होऊन दादी बाबांच्या कुशीत गेल्या. बाबांच्या निःस्वार्थ प्रेमाने दादींना बाबांचा दिवाना बनवलं. दादींची अवस्था जणू 'वेड लागले राधेला' अशी झाली. त्या आईवडिलांना म्हणाल्या, 'मी आता बाबांकडे राहीन.' त्यांनीही आनंदाने परवानगी दिली अन् लहान मुलांसाठी काढलेल्या बोर्डिंग मधे सात वर्षीय 'ईश्वरी' आत्मिक व लौकिक शिक्षण घेऊ लागली. त्या दरम्यान दादींपेक्षा सहा वर्ष छोटी असलेली बहीण 'लच्छु दादी' व चार भावांसहीत दादींचा पूर्ण परिवार समर्पित झाला.

ह्या काळात सिंध हैद्राबाद मधे पवित्रतेच्या व्रतामुळे प्रक्षोभ उसळला. ब्रह्माबाबा कराचीला गेले. वसतिगृहातील ज्या मुलांच्या नावे वॉरंट निघालं होतं ते आपआपल्या घरी गेले; पण दादी बाबांच्या सोबत कराचीला गेल्या. बाबा ज्ञानमुरली चालवत तेव्हा ईशु दादी नोटस् घेत, पण बाबांची बोलायची गती खूपच वेगवान असे, त्यामुळे कुणीच मुरली जशीच्या तशी लिहू शकत नसे. म्हणून ईशू दादींनी परमात्म संकेत हेरून सांकेतिक लिपीची रचना केली. लांबलचक शब्द व वाक्यांची प्रतीके बनवली, जसं धृतराष्ट ह्या शब्दासाठी फक्त 'धृ' हे अक्षर, सृष्टीचक्रासाठी गोल चिन्ह, लक्ष्मीनारायण साठी एल.एन. (LN) असे कित्येक चिन्हं नोट करुन पाठ केली, त्यांच्या आधारे दादी बाबांची मुरली ऐकता-ऐकता जशीच्या तशी लिहून काढत. दादी मम्मांसोबत राहत व बाबा वेगळे राहत. म्हणून त्या बाबांपाशी क्लिफ्टन वर भेटायला जात, तिथे बाबा त्यांना प्रेमाने गोड-गोड गोष्टी सांगून खुश करत. बाबा म्हणत, 'आनंदासारखा खुराक नाही, म्हणून मुलांनो सदैव आनंदी रहा, हसत-खेळत, नाचत-गात रहा, कधी नाराज होऊन रडू नका, मुड ऑफ करू नका, कोमेजूनही बसू नका.' दादी म्हणत, 'बाबा तुम्ही सांगितलेल्या छान-छान गोष्टी नोट केल्यात,' हे ऐकून बाबा प्रसन्न होत व खूप प्रेम

करत. मम्मांच्या भवनामधे परतल्यावर मम्मा त्यांना बाबांशी काय हितगुज केलं हे विचारत, दादी बाबांच्या गोष्टींचं छान वर्णन करत, ते ऐकून सर्व टाळ्या वाजवत. दादींना आपल्या भाग्याविषयी अभिमान होता की बाबांनी बालपणीच आपलंसं केलं! १४ वर्षांच्या योगभट्ठीत मम्मा बाबांच्या समीप राहून प्राप्त केलेल्या अपार आनंदाचं वर्णन करताना, दादींच्या हृदयवीणेची तार छेडली जाई व त्या म्हणत, 'खुशीयों भरी जिंदगानी हमारी, देवी-देवताओं से भी जो है प्यारी!'

शांत स्वभावी ईशु दादींच्या ईमानदारीचे संस्कार पाहून, दादींमधील सुप्तगुण बाबांनी तेव्हाच ओळखले होते. गुणवृद्धी करून दादींचे जीवन विकसित कसे होईल याविषयी बाबांचा नेहमी कटाक्ष असे. दादी बाबांचा जणू उजवा हात बनून, यज्ञाचा स्थूल-सूक्ष्म खजिना आणि आर्थिक कार्यव्यवहार सांभाळण्यासाठी निमित्त बनल्या. बाबा-मम्मा प्रेमाने त्यांना 'मनी प्लांट' म्हणत. बाबांच्या प्रत्येक आदेशाला शिरसावंद्य ठेवून श्रीमताप्रमाणे चालत राहिल्या प्रत्येक परीक्षेच्या कसोटीवर खऱ्या ठरल्या. एके दिवशी बाबांनी फरमान काढलं, '१५ दिवस बाहेरची कुणीही व्यक्ती आत येणार नाही, अगदी सफाई कामगारही नाही...! गेट बंद करून कुलूप लावा, सर्व काही स्वतःच्या हातानेच करा.' त्यामुळे ड्रायव्हरही येऊ शकत नव्हता. यज्ञात एक मोठी बस होती, बाबा म्हणाले, 'बसची सफाई तुम्हीच करा.' तेव्हा ईशु दादींनी काळे कपडे घालून, बसच्या खाली जाऊन, सफाई केली.

भारत पाकिस्तान विभाजन झाल्यावर ईशु दादी बाबांसोबत आबूला आल्या. तेव्हा ओममंडळी आर्थिक मंदीचा सामना करत होती, पण बाबांनी त्याची थोडी सुद्धा जाणीव होऊ दिली नाही. बाबा पांडव भवन ते गुरुशिखर(पीस पार्क) पर्यंत पायी घेऊन जात, युवावस्थेत सर्व दादी पहाड चढून जात आणि चेरी व कैरी (कच्चे आंबे) खाऊन खुश होऊन परत येत. बाबा सोबत असल्याने निष्कांचन जीवन असूनही सर्व खूश असत. एकदा दादी व इतर तीन बहिणींना जुलाब झाले, हे विश्वकिशोर दादांना कळलं, पण त्यांच्या कडे फक्त एक आणाच शिल्लक होता, तो देऊन दादांनी एक गोळी आणली, बाबांनी ४ तुकडे करुन रुग्ण बहिणींना पाण्याबरोबर पाजले. दादींच्या निश्चयांची कमालच म्हणावी! जुलाब एकदम ठीक झाले. असेच एके दिवशी बाबा सर्वांना पांडव भवन पासून पायीच आबू रोड पर्यंत (शांतिवन) घेऊन आले. रात्री एका शाळेत सर्वांनी विश्रांती घेतली. सकाळी सर्व जागे झाल्यावर बाबा म्हणाले, 'डोक्यावर मोठ-मोठे तांबडे भोपळे घेऊन चला, कुणी पडला तर तो फेल! तेव्हा सर्वांनी डोक्यावर तांबडा भोपळा घेऊन मोठ्या मेहनतीने आबू पर्वत गाठला, तेव्हा मम्मांनी बस स्टैंडवर येऊन गुलाब पाण्याने स्वागत केलं अन् सर्वांचे उत्साहवर्धन केले. बाबा-मम्मांसोबत घालवलेले अतींद्रियसुखाचे दिवस आठवताच दादींचा आनंद गगनात मावेनासा होई. त्या भावविभोर होऊन खुशीने गाऊ लागत, 'वो दिन भी कितने प्यारे थे, जब बाबा साथ हमारे थे!

चाणाक्ष बाबांनी सर्व दादींना सेवेसाठी पाठवलं बाबांच्या ज्ञान मुरलीचे गारुड असलेली मुलं ज्ञान मार्गात येऊ लागली. ईशू दादींना बाबा म्हणत, '१२वाजता पोस्ट येईल, इतर कामं सोड, ११ वाजेपर्यंत मुरली लिहून तूच पूर्ण कर!' तेव्हा दादी हा विचार करत नसत की मी कसं बरं करु शकेन? परंतु बाबा लिहून घेत आहेत, ह्याच नशेत व खुशीत, मुरलीचं एक अक्षरही न चुकता, चार-चार पानांची मुरली स्वतः लिहीत, मुरलीच्या प्रती बनवत व वेळेवर ज्ञान मुरली पोस्टही करत. अव्यक्त बापदादांच्या अवतरणाच्या वेळीही त्या रात्र-रात्र जागून मुरली लिहीत. ऐकून रिवाईज होत असलेल्या साकार व अव्यक्त मुरलींद्वारे ईशु दादी ईश्वरी महावाक्यांचा अक्षय खजिना शेवटपर्यंत अनुभवत राहिल्या. खरोखरच ईशु दादी, तर ज्ञानसागर प्राशन करणाऱ्या त्या सोने की चिडीयां (गोल्डन स्पारो) होत्या.

सर्वत्र ईश्वरी सेवेचा विस्तार होऊ लागला, ब्रह्माबाबा पत्रांनी मार्गदर्शन करुन ब्रह्मवत्सांमधे उत्साह भरत. जे फक्त हिंदी जाणत, त्यांच्यासाठी बाबांनी स्वहस्ताने सिंधी लिपीत लिहिलेल्या लाल अक्षरांच्या पत्रांवर ईशुदादी हिंदीत लिहीत. जे सिंधी भाषा वाचत, त्यांना पत्रावर साफ सिंधीत लिहीत. बाबांना कधी बद्ध गोपींचे आत्मिक प्रेम-पत्र, कधी जीवन कहाणीचे पत्र तर कधी व्यक्तिगत पुरुषार्थाचे चार्ट, कधी सेवाक्षेत्रामधील समस्यांची पत्रे येत. ही सारी पत्रे दादी आधी वाचून काढत आणि पत्रांमधील गुप्त गोपनीय गोष्टी व कर्माचा हिशोब जाणून, प्रत्येकाच्या कर्म-कहाणीची चित्रगुप्त बनून नोंदणी करुन बाबांना ऐकवत, तरीही त्यांच्या मानसपटल वा बुद्धीवर अंशमात्र अशा गोष्टींचा ठसा उमटत नसे. जसे गंगा आपलं सारं जल

समुद्रात अर्पण करून स्वच्छ होते, असंच दादी सर्व समाचार सांगून, शिवसागरात सामावून देत. निर्मळ गंगा बनून जात. बाबांनी लिहिलेल्या उत्तरांदाखल पत्रांमधे लाल शाईने लिहिलेल्या अक्षरांवर हूबेहूब सिंधी किंवा हिंदीत निळ्या अक्षरामधे लिहून उत्तर देत, कधी त्या एका तासात सोळा-सोळा पत्रही लिहीत. बाबा जिथे जात, तिथे ईशु दादींनाही घेऊन जात आणि त्यांना प्रायवेट किंवा पर्सनल सेक्रेटरी म्हणत.

ब्रह्माबाबा अव्यक्त झाल्यानंतर ईशु दादी, दीदी मनमोहिनी व दादी प्रकाशमणींच्या सोबत त्यांचा उजवा हात बनून राहिल्या. दीदी मनमोहिनी साडी प्रेससाठी न देता, घडी घालून साडी खुर्चीवर ठेवून त्यावर बसत, त्यामुळे साडी आपोआप प्रेस होई, असंच क्वीन मदर (दीदींच्या लौकिक आई) श्रीमंत घरच्या असूनही पाई-पैशाचा हिशोब ठेवत, क्वीन मदर व दीदींच्या सोबत राहून दादी काटकसर करणं शिकल्या. दीदी सेवांसाठी जाताना ईशुदादींना सोबत नेत, आधी दीदी बोलत, नंतर ईशु दादींना बोलायची संधी देत. प्रकाशमणि दादींकडून ईशुदादी गंभीर राहणं शिकल्या. बाबा म्हणत सर्व कामं हातानेच करा, इतरांना आधार बनवू नका. त्यामुळे दादींनी एका शिवपित्याला जीवनाधार बनवलं सदैव साधन सुविधेपासून स्वतःस दूर ठेवून इतरांकडून सेवा घेतली नाही. पाण्डव भवनामधे एका छोट्या खोलीत एक कॉट व दोन कपाटं, त्यात यज्ञाच्या व येणाऱ्या मौल्यवान वस्तू ठेवत. छोट्याशा जागेत दादींनी आयुष्य काढलं, बाबांनी ती खोली दिली म्हणून मोठ्या खोलीत गेल्या नाहीत. दादी सिम्पल राहून साधेपणाचे उदाहरण बनून, सर्वांना प्रेरणा देत राहिल्या.

कानपुरच्या दिवंगत विद्या दीदी ईशुदादींची वैशिष्ट्ये सांगतात, 'दादी मधुर स्वभावी होत्या, खूप कमी व हळू बोलत. दादींचं चालणं देवता व देवदूताचं होतं. त्यांच्यात घायकुतेपणा कधीच पाहिला नाही. सुरुवातीला पाण्डव भवनमधे होमियोपॅथी स्टोअरच्या मागे क्लास होई. बाबांची भण्डारी (दानपात्र) क्लासमधे नव्हती ईशुदादींच्या ऑफिसमधे त्यांच्या खुर्चीपाशी असे, त्यात सर्व दान टाकत. ती भण्डारी दादीच उघडत व पाई-पाईचा चोख हिशेब ठेवत. एकदा कानपुरहून एका बहिणीसोबत काही मंडळी आली. कुणी किती सफल केलं ते लेखी टोटल केलं जाई, बहिणीने हिशेब केला, पण तीनशे रुपये कमी पडले. पुन्हा-पुन्हा मोजूनही हिशेब लागेना, तेव्हा मी माझ्या वतीने ३००रुपये भरुन दिले. दादींना यज्ञात सफल केलेल्या एक-एक पैशाची खूप किंमत व महत्त्व होतं. एकदा दादी कानपुरला आल्या, कुणी ८आणे, कुणी ४आणे तर कुणी १०पैसे ही दिले. मी म्हणाले, 'दादी चिल्लर काय करणार?' त्या म्हणाल्या, 'ज्यांनी जे दिलयं, तेच यज्ञात जाईल, मग ते चार आणे असोत!' मी पुन्हा म्हणाले, 'मी बँकेतून चिल्लर देऊन नोटा आणते,' दादी म्हणाल्या, 'आणे, पाई, रुपये, नोटां जशा आल्या, तशाच यज्ञात जमा होतील. बँकेत ते बदललं तर ती राऊंड फिगर होईल, ती पूर्ण ईमानदारी होणार नाही.' ईमानदार दादी एक नया पैसा ही वर-खाली होऊ देत नसत. दादी व्यक्तिगत गिफ्ट्स घेत नसत, कुणी काही दिलं तर लगेच बाबा-मम्मांना व नंतर प्रकाशमणी दादींना नेऊन देत. त्या म्हणत, 'मला जे पाहिजे ते यज्ञातूनच घेईन.' दादी स्वतःच्या आचरणातून शिकवण देत. एकदा मुरली लिहितांना पेन चालेना, म्हणून एका भावाकडून घेतले, दादींनी समजावलं की मला बोलली असतीस तर मी ऑफिसमधून आणून दिलं असतं, त्या भावाकडून कशाला घेतलं? लिहितांना त्याची आठवण येईल व यज्ञातून पेन घेतलं असतं तर बाबांची आठवण येईल.' बाबांनी सेवेसाठी मला गंगेदादींपाशी कानपुरला पाठवलं. दादींनी मला मिर्जापूरला पाठवलं, मी लहान होते. तिथे काही लोकांनी मुरली न समजल्यामुळे विरोध केला व कलेक्टरकडे तक्रार करून आमच्या मागे सी.आय.डी. लावले. ते बाबांचे पत्र व मुरली घेऊन जात, पण त्यांना काही समजेना. एक सी.आय.डी. सात दिवसाच्या कोर्सचा बहाणा करून आला व बाबांचे पत्र व ज्ञानमुरली वाचायला सांगितली. पण त्याला अर्थ कळेना. तेव्हा मी सांगितलं, 'परमपिता परमात्म्यासाठी ३'पी'(P), एलएन (LN) म्हणजे लक्ष्मीनारायण, रामसीतेसाठी आरएस(RS) व बीवीएस(BVS) म्हणजे ब्रह्मा-विष्णु-शंकर.' तो म्हणाला, 'मी इतक्या गुप्तहेरांची पत्रं वाचली; पण बाबांचे पत्र व मुरली समजण्यात फेल झालो.' बरीच शहानीशा केल्यावर ते सी.आय.डी. ऑफिसर ब्रह्मावत्स बनले, ही होती दादींच्या शॉर्टहॅण्डची कमाल!.

शांतीवनच्या कविता बहनजी दादींच्या गुणांचं वर्णन करतात, 'ममतामयी ईशुदादी धांदलीच्या

परिस्थितीतही उपराम, अचल-अडोल व साक्षीदृष्टा होऊन राहत. एकदा बाबा म्हणाले, 'जवळ दागिने असले तर त्यात बुद्धि जाईल, म्हणून जमा करा.' सर्वांनी सर्व समर्पित केलं. त्यातलं एक घड्याळ बाबांनी दादींना दिलं. ते हाताच्या ऊर्जेवर चाले, बॅटरीचा खर्च वाचल्याने ते दादींना अतिप्रिय होते. दादी बाबांच्या सोबत असल्याने वेळ सांगत. एकदा त्यांच्या कपाटात एक रुपया सापडला, मी म्हणाले, 'दादी खजिना मिळाला' लगेच त्यांनी गोलक भाईंना दिला, ते म्हणाले, 'नंतर दिला असता' त्या म्हणाल्या, 'एक रुपया नव्हे, बाबांची ठेव आहे, एक रुपयासुद्धा माझ्याकडे का असावा!' कधी मी म्हणाले, 'बाजारातून ही वस्तू आणू? परवानगी द्या,' त्या म्हणत, 'गोलक भाईंना लेखी दे, पैसे घे, वस्तू आणून हिशेब दे,' दादी एक-एक पैशाचा हिशेब ठेवत. कित्येक दिवस माझं डोकं दुखत होतं, मी डॉक्टरांना दाखवलं, तपासून ते म्हणाले, 'नस कमजोर आहे, ऑपरेशन करावं लागेल.' मी शांतीवनला आल्यावर दादींनी फुलमाळेने स्वागत करून विचारलं, 'काय झालं?' मी बाबांच्या रुममधे जाऊन रडू लागले. दादी म्हणाल्या, 'इतक्या छोट्या गोष्टीने घाबरली! सुप्रीम सर्जन बाबा ठीक करेल' अन् ममतेने दादी डोक्यावर हाथ फिरवू लागल्या, वाटलं ब्रह्माबाबाच कुरवाळत आहेत. अल्पावधीतच ऑपरेशन न करता, औषध न घेता डोकेदुखी कायमची बंद झाली. पाण्डव भवनमधे ईशुदादी व मुन्नीदीदींचं बाथरुम एकच होतं. एकदा दादी बाथरुममधे होत्या, मुन्नी दीदींनी विचारलं, 'दादी, किती वेळ लागेल?' दादींना वाटलं मुन्नीदीदींना प्रकाशमणी दादींच्या सेवत उशीर होईल. म्हणून दुसऱ्या दिवसापासून एका हातात बादली-मग व दुसऱ्या हातात कपडे घेऊन, ट्रेनिंग सेंटर मधे रिकामे बाथरुम शोधून स्नान करत. दादी खूप महान व नम्र होत्या. एकदा डॉ. सतीश गुप्तांनी दादींना विचारलं, 'दादी कशा आहात?' त्या म्हणाल्या,' मी नेहमीच ओके असते' मी म्हणाले,'दादींचं पोट फुगलेलं का असतं?' डॉक्टर म्हणाले, 'दादींना हलकं भोजन द्या.' मी म्हणाले, 'हलकंच देते, पण दादी तीनदा पापड खातात. पापड जड असतो का?' ते म्हणाले, 'त्यात डाळी असतात' सिंधी लोक पापड प्रेमाने खातात. मी म्हणाले, 'पापड हळू-हळू सोडवू' दादी म्हणाल्या 'पापड न खायला माझी काहीच हरकत नाही.' दादींनी झटक्यात पापड सोडला, नंतर पापडाला शिवल्या सुद्धा नाहीत. ही होती दादींची कमालीची कंट्रोलींग पॉवर!

शांतीवनचे खगेंद्र भाई दादींची वैशिष्ट्ये सांगतात, 'वयाच्या ८५ वर्षापर्यंत दादी स्वतःची कामं स्वतः करत. दादींनी शरीर छान सांभाळलं, शेवटपर्यंत ३२ दात होते. हार्नियाशिवाय इतर आजार नव्हता. एकदा वर्धा येथे दादी सेंटरचं उद्घाटन करत होत्या, ५०० मीटर दूर खूप पाऊस पडत होता, मात्र कार्यक्रम स्थळी एक थेंबही पाऊस पडत नव्हता. कार्यक्रम संपताच सामान आवरल्यावर तेथे जोरात पाऊस पडला. खरंच दादी प्रकृतीजीत होत्या. अशीच विशाखापट्टनमच्या विमानतळाची गोष्ट आहे, आमच्याजवळ खूप सामान होतं, वजन केल्यावर ३५ किलोपेक्षा जास्त निघालं. मैनेजर म्हणाला, '१६ हजार दंड पडेल.' आम्ही म्हणालो, '१० हजार देऊ' मॅनेजर म्हणाला, '१० हजारच द्या' पण साथी भावाने सांगितलं म्हणून दादींनी स्टाफला स्नेहाने शक्तिशाली दृष्टी व टोली दिली. नंतर मॅनेजर आला व सर्व सामान घेऊन विमानात ठेवून आला. ही होती दादींच्या दृष्टी व टोलीची जादू.

ज्या पात्रात (भांड्यात) पाणी टाकलं, पाणी त्या पात्राचं तसच रुप घेतं अन् स्वतःला त्यात सामावून घेतं. तसं बाबा-मम्मा, दीदी-दादी व मोहिनी दीदी-मुन्नी दीदींच्या संगतीत ईशुदादी तशा राहिल्या, असंच परिस्थितीं प्रमाणे स्वतःला घडविणाऱ्या 'मोल्ड सो रियल गोल्ड' बनून 'सहनशक्तीची मूर्ति' बनून, त्या कायम राहिल्या. त्या विविध संस्कारांच्या व्यक्तीत मिसळून जात व त्यांच्या गोष्टींना सागरा समान विशाल ह्रदयात सामावून घेत. व्यर्थ बाबींना सेकंदामधे फुलस्टॉप (पूर्णविराम) लावत. खरे तर ईशुदादी ह्या परमात्म ज्ञान-तिजोरीच्या संवर्धक व यज्ञ-तिजोरीच्या रक्षक होत्या, मधुबनमधे आल्यावर अनेकजण दादींपाशी भंडारी (दानाची रक्कम) देऊन सर्व निश्चिंत होत. अखेरच्या दिवसात त्या बालसुमनां सारखं खळखळून हसत व हसवत आणि सर्वांवर प्रसन्नतेची पुष्पे उधळत. धीर-गंभीर असूनही रमणीकता व अंतर्मुखता ह्या दोन गुणांमधे अद्भुत संतुलन साधून दादींनी आध्यात्मिक साधनेची पराकाष्ठा गाठली. बाबा-मम्मा आणि दीदी-दादींच्या आज्ञाधारक ईशुदादीजी गंभीरतेच्या प्रतिमूर्ति व प्रामाणिकपणाच्या साक्षात देवी होत्या. अशा एकनामी एकानॉमीच्या अवतार, शांतीच्या आदर्श ईशुदादीजी ६ मे २०२१

(पृष्ठ क्र.८ वर)



# उन्नतीसाठी लबाडी करणे योग्य आहे का?

**ब्र.कु. आशा दीदी, दिल्ली**

**मी बाबांच्या कुशीत राहणारी अधिकारी आत्मा आहे. ही स्मृती सदैव असू द्या.**

आपण सर्वांनी लहान असताना ध्रुव बाळाची गोष्ट ऐकलेलीच आहे. ध्रुव बाळ आपल्या वडिलांच्या मांडीवर बसलेला असतो. त्याचवेळी त्याची सावत्र आई त्याला ढकलून आपल्या मुलाला राजाच्या मांडीवर बसवते. सावत्र आईच्या अशा वागण्याने ध्रुव फार व्यथित होतो. रडत रडतच तो आपल्या आईकडे जातो म्हणतो, 'आई, छोट्या आईने मला ढकलून आपल्या मुलाला बाबांच्या मांडीवर बसवले. का केले तिने असे?' आणि यावर आईने काय बरं उत्तर दिले असेल? 'अरे बाळा, तुझे बाबा तर एक माणूसच आहेत. त्यांच्या मांडीवर बसणे म्हणजे मनुष्याकडून सुखाची अपेक्षा करणे होय. पण बाळा आता तू अशी काही तपस्या करून दाखव की परमेश्वरी कुशीत बसण्याचा तू अधिकारी होशील. परमेश्वरच आता तुला आपल्या मांडीवर बसवेल.' पुढची कहाणी तर आपण सारेजण जाणतोच.

ध्रुव बाळाने आकाशात अढळ पदाच्या प्राप्तीसाठी किती घोर तपस्या केली ते! ध्रुव बाळाने न्याय्य मार्गाने स्वत:साठी अढळपद मिळवले. ज्यांनी त्याचा अधिकार नाकारला त्यांच्याविषयी ना असूया बाळगली ना दुस्वास केला. आपल्यालासुद्धा अडचणींवर मात करताना कुणाबद्दल राग असता कामा नये. कुठल्याही परिस्थितीत मूल्यांशी तडजोड करायची नाही. बघा बरं आज आकाशात आपण ध्रुव ताऱ्याला शोधत असतो. अशाप्रकारे आपण स्वतःला त्या अढळ पदप्राप्तीपर्यंत न्यायचे आहे. जीवनात लहान सहान गोष्टी घडतच असतात, मी हे जाणले परीक्षा येतात, टाळता न येण्याजोग्या गोष्टी घडतात. पण अशा अप्रिय गोष्टींची सारखी आठवण काढून दुःख करत बसू नका. कारण गोष्टी उगाळल्याने त्यांना आपण ऊर्जा देतो त्यामुळे त्या दगडावरील रेषेसारख्या अधिक ठळक होतात. परत कधी पुसल्या न जाण्याइतक्या कठिण होऊन बसतात. एक प्रकारे त्या गोष्टींमध्ये प्राण येतात, त्या जास्त जिवंत होऊन भूतासारख्या आपल्याच मानगुटीवर बसतात आणि आपल्याला निराशेच्या खोल गर्तेत ढकलून मोकळ्या होतात. मग नकारात्मक भावनांचा फास आपल्या गळ्याभोवती कधी आवळला जातो ते कळतही नाही. म्हणूनच गोष्टी जिथल्या तिथे सोडून द्यायला शिका. गोष्टी, प्रसंग हे शक्तीशाली नसून मी आत्मा त्यांचा रचयिता अधिक शक्ती सम्पन्न आहे हे जाणून जीवनात संयम येण्यासाठी सहनशील रहावे. त्यासाठी सकारात्मक विचारांची जोड अत्यंत आवश्यक आहे. सकारात्मक विचार येण्यासाठी मुरलीधरच्या मुरलीवर प्रेम असणे म्हणजे रोजची मुरली अभ्यासपूर्वक वाचणे, त्यावर मनन-चिंतन करणे खूप गरजेचे आहे.

लबाडी करून माणूस पैसा, मान-मरातब पद, प्रतिष्ठा अशा अनेक गोष्टी मिळवू शकेल; पण आंतरिक सुख समाधान मात्र मिळणे दुरापास्तच आहे. पाया कमकुवत असल्यावर इमारत आज ना उद्या कोसळणारच तसेच जीवनाच्या बाबतीत घडते. तात्कालिक फायदा डोळ्यासमोर ठेवून केलेली कृत्ये शाश्वत सुख देऊच शकत नाही. मात्र सन्मार्गावर चालण्याकरिता मानसिक शक्ती लागते. केवळ तोंडच्या वाफा दवडून काही साध्य होत नाही. मानसिक शक्ती प्राप्त करण्याकरिता राजयोग हा उत्तम मार्ग आहे हे मी स्वानुभवातून सांगते.

***

---

(पृष्ठ क्र. ७ वरून)

सतगुरुवारी संध्याकाळी ८ वाजता बापदादांच्या कुशीत सामावल्या व विश्व सेवेसाठी मार्गस्थ झाल्या, त्यांना अमुचे शत् शत् नमन...

***

ब्रह्मावत्सांकरिता



# राजयोग म्हणजे....

ब्र.कु. डॉ. सचिन, ग्लोबल हॉस्पिटल

राजयोग म्हणजे ईश्वराच्या ज्ञानावर आणि ईश्वरावर प्रेम. राजयोगाची तिसरी व्याख्या काय?

तिसरी परिभाषा - बाबांवर प्रेम अर्थात्‌च त्यांनी दिलेल्या सेवेवर प्रेम - आपले हे जीवनच सेवेकरिता आहे. सूक्ष्म व्यर्थ विचार आला तरी त्याचा प्रभाव सेवांवर पडतो. सूक्ष्म रुपात आळस, अपवित्रता आली तरी त्याचा सेवेवर प्रभाव पडतो. २४ तास प्रत्येक आत्म्यामधून कोणत्या ना कोणत्या तरंग लहरी (व्हायब्रेशन्स) निघत असतात. आपण एकांतात सर्व दारे, खिडक्या लावून काय काय करतो तेच आपले चरित्र. सेवेकरता हे जीवन दिले आहे. बाबांवर प्रेम म्हणजेच त्यांच्या सेवेवर प्रेम. बाबा म्हणतात, बहाणे देऊ नका; 'महारथी पण असे करतात.' ते जेव्हा काही चूका करतात तेव्हा त्या कालावधीकरिता ते महारथी नसतातच. त्यांचे नाव पुढे करून तुम्ही स्वतःलाच फसवत आहात. कधीही बहाणे सांगू नका. माझे संपूर्ण जीवन सेवाअर्थ आहे. स्वतःला तयार करायचे आहे. अजून एक सूक्ष्म गोष्ट, जर काही विकर्मे घडली आहेत, पाप कर्मे झाली असली तरी सेवा पुण्याचे खाते वाढवते. तसे सेवा आत्मशुद्धीचे साधनही आहे. सेवा एक प्रकारे प्रायश्चित्त आहे कारण ब्राह्मण झाल्यापासून आपल्याकडून काही पापकर्मे झाली असतील, सूक्ष्मपणे श्रीमताचे उल्लंघन झाले असेल, तर सेवा करायची इच्छा नाही, उदास वाटत आहे, दुःखी वाटते; त्यावेळी मला सेवा करायचीच आहे असा विचार करा. सेवा उत्साह आणण्याचे साधन आहे. सेवांमुळेच अनेक आत्म्यांचे कल्याण होईल, तसेच सेवांमुळे अनेकांचे आशीर्वादही मिळतील. सेवांमुळे मनावर असलेला ताण, विचारांचे, पूर्व कर्माचे जे ओझे आहे ते हलके होईल. एकच सेवा नाही रोज नवनवीन सेवा, रोज नवीन योजना हे सर्व योजनांचे संकल्प अमृतवेळेला येतील म्हणूनच ज्यांची अमृतवेळ शक्तीशाली त्यांची प्रत्येक गोष्ट शक्तीशाली होईल, त्यांचे ब्रह्मचर्य शक्तीशाली, त्यांच्या सेवा शक्तीशाली, त्यांची स्थिती शक्तीशाली असेल. सेवांमध्ये स्थिती वर-खाली होते. बाबांची महावाक्य आहेत - ''सेवा बाबांनी सांगितलेल्या पद्धतीने नाही केली तर, सेवांमधले निर्लिप्त भाव नष्ट होतात. बाबांनी नुकत्याच झालेल्या मुरलीत ३ गोष्टी सांगितल्या - १) दृढ संकल्प २) संस्कारांची टक्कर ३) स्वभावात मतभेद, शक्तीहीनता. शक्तीहीनता कोणती? एखाद्याने आपल्याविषयी खोटे सांगितले म्हणून क्रोध आला. बाबा म्हणतात, 'संपूर्ण विश्व एका बाजूला, सगळे खोटे एका बाजूला, तुमच्याकडे तर खुद्द परमेश्वर तुमचा पिता आहे. त्याच्याकडून यथार्थता जाणून घेतली की झाले, आणखीन काही करायची गरजच नाही. तुमचा विजय निश्चित आहे; तर बाबांवर प्रेम अर्थात् सेवेवर प्रेम. सेवांमध्ये एवढे व्यग्र व्हा की सकाळपासून संध्याकाळपर्यंत इतर व्यर्थ गोष्टींना वेळच नसेल, दिवस-रात्र सेवेमध्ये असाल तर माया कोठून येईल? बाबांकडे गोदरेज नाही तर 'गॉड लॉक' आहे.

सेवा, सेवा, सेवा रोज सकाळी अमृतवेळा पूर्ण झाली की योजना करा. आज कोणती सेवा करायची, तक्ता बनवा, आपल्या शहराचा नकाशा बनवा, कोणते वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, कोणते कारखाने अशी कोणती ठिकाणे राहिली आहेत जिथपर्यंत आपण अजून सेवांकरता गेलो नाहीत. दिनदर्शिका (कॅलेंडर) बघा, इंटरनेटवर जा आज महिन्याचा कोणता दिवस आहे? आरोग्य दिवस, कामगार दिवस काही आहे का? ते बघून सेवाकेंद्रावर त्यांना आमंत्रित करु शकता. सेवांमध्ये व्यग्र असाल, तर माया सम्पर्क साधण्याचा

प्रयत्न जरुर करेल, परंतु तिला एकच आवाज ऐकू येईल ह्या मार्गावरील सर्व क्रमांक व्यग्र आहे. स्वार्थ करता वेळच नाही. कोण काय करत आहे? ह्यांनी काय केलं? त्यांनी असं का केलं? ह्या शाखेमध्ये काय होते? ह्या सेवाकेंद्रात हे असं कसं चालू आहे?'' स्वतःवरच फक्त लक्ष केंद्रित करा आपल्या कामाशी काम ठेवा. ह्या इतर गोष्टींमध्ये आपल्याला जायचे नाही.

४) **चौथी परिभाषा – ईश्वरावर प्रेम अर्थात् मधुबनवर प्रेम.** मधुबनच्या भूमीवर प्रेम. ब्रह्माबाबांची ही चरित्र भूमी आहे. परमात्म्याच्या अवतरणाची भूमी आहे. ही मधूर भूमी आहे. ही कर्म भूमी आहे, ब्रह्माची ही कर्मातीत भूमी आहे. ह्या भूमीशी प्रेम, पराकोटीचे प्रेम. आपण कोठेही राहतो. सेवाकेंद्र असू दे किंवा घर २४ तासात कमीत कमी २ वेळा तरी मधुबनमध्ये मनाच्या विमानातून जाऊन यायचे. मधुबनची प्रदक्षिणा, शांती स्तंभाला प्रदक्षिणा, हिस्ट्री हॉल, बाबांची खोली, बाबांची पर्णकुटी येथे जाऊन आल्यावर डायमण्ड हॉलमध्ये ही एक चक्कर मारुन यायचे. बाबा म्हणतात ही वेळ, हे संघटन यांचे चित्र डोळ्यांपुढे आणा, मी कोठे बसलो होतो, इथे मी पवित्रतेच्या व्रताची प्रतिज्ञा केली होती. इथेच बसून सम्पूर्ण जागृती प्रतिज्ञा केली होती. ती कोणती वेळ होती, कोण ते लोक होते ज्यांच्यामध्ये बसून मी ही प्रतिज्ञा केली होती? पवित्रता म्हणजे फक्त ब्रह्मचर्य नव्हे, तर 'ब्रह्माचारी' (ब्रह्मा बाबांच्या आचरणाचे पालन करणे) ह्या मधुबनवर प्रेम, ह्या भूमीवर प्रेम, त्याच्या कणा कणावर प्रेम.

''धन्य भूमि बन पंथ पहारा, जहां जहां नाथ पाऊ तुम धारा'' ज्या भूमीवर परमात्म्याचे पाय लागले त्या भूमीवर माझे किती प्रेम असले पाहिजे? बायबलच्या एका गोष्टीत ईसामसीह म्हणतो. ''प्रभूच्या या घरावर माझे प्रेम प्रेमअग्नी प्रमाणे आहे.''

तसेच प्रेम परमात्म्याच्या ह्या घराशी असले पाहिजे. इथे येऊन हे काय? ते काय? हे बघू नका. खुद्द परमेश्वर ह्या भूमीचा रचनाकार आहे. त्यांना सगळं माहीत आहे, कुठे काय आहे. त्यांच्या तोंडून ह्या मधुबनविषयी उच्चारलेले शब्द ऐकले आहेत ना? शुद्ध संस्कृतीचा हा द्वीप आहे. हे विश्व एक द्वीप आहे. ह्या लंकेमध्ये ही मधुबन परमेश्वराची नगरी आहे. इथे येणाऱ्या प्रत्येकाला बाबांनी निवडले आहे. त्यांच्या निवडीत कधीही चूक होऊ शकत नाही. परमेश्वराने निवडलेले लोक इथे आहेत. मधुबन करता मनामध्ये कायम आदरयुक्त भावना असली पाहिजे अगदी येथे राहणाऱ्यांनीही हे लक्षात ठेवा. परमेश्वराने रचलेले हे मधुबन आहे. किती महान आहे, दिव्य देवदूतांचे हे मधुबन आहे, किती हे सुंदर मधुबन आहे. बाबांवर प्रेम अर्थात् मधुबनवर प्रेम.

कोणाला जर वाटत असेल माझे बाबांवर प्रेम आहे; पण मधुबनवर थोडे कमी; तर तसेही नाही. किती भाऊ-बहिण ३-४ वर्षांनी मधुबनला आले आहेत. काही म्हणतात बाबा आता तर आम्ही इथेच (लौकीक घरात) राहून तुम्हाला भेटू. बाबा मिलन घरात राहूनच करू. परंतु मधुबनमध्ये येणे म्हणजे संघटनात येणे. एक चुंबकीय ओढ आहे. इथे ज्या जागी आपण बसलो आहेत. ह्या जागेत ईश्वरीय शक्तिंचा संचार आहे. अचानक जीवनातील एखाद्या प्रश्नाचे उत्तर येथे मिळून जाईल. जन्मोजन्मी बुद्धिरुपी कपाट बंद आहे. त्याचे कुलुप उघडून जाईल. हे येथेच होऊ शकते. माया कितीही सम्पर्क करायचा प्रयत्न करु दे, आपण नेहमी मधुबनच्या प्रेमात व्यग्र रहायचे. मधुबनच्या आठवर्णींमध्ये येथून गेल्यावरही रोज रमून जायचे, इथल्या भूमीच्या प्रकंपनांच्या, इथल्या सेवांच्या, इथल्या विशाल कार्याच्या आठवणीत रमून जायचे.

५) **पाचवी परिभाषा – बाबांवर प्रेम अर्थात् त्यांच्या परिवारावर प्रेम** येथे जे बसले आहेत ते सर्व कोण आहेत? अतिशय प्रिय, अनेक वर्षांनंतर परत भेटलेले, परमात्म्याच्या प्रेमास पात्र मुले आहेत सर्व. ह्या सर्वांविषयी आपल्या मनात शुभ भावना आहेत? कुठे भूकंप झाला त्या आत्म्यांना सूक्ष्म मदत केली आणि काम पूर्ण झाले; परंतु ह्या परिवारा करता आपण काय केले? ह्या परिवारातील आत्म्यांविषयी आपल्या मनात काही ना काही जरूर आहे.

एक महत्त्वपूर्ण गोष्ट सर्वांनी रोज करायची आहे. अमृतवेळेला ४ मुख्य गोष्टी प्रत्येक ब्राह्मणांनी करायच्या आहेत –

१. सर्व आत्म्यांना सूक्ष्ममध्ये समोर आणायचे. ब्राह्मण परिवारातील असो किंवा इतरही आत्मे असोत. कधीही त्यांना कोणत्याही जन्मात आपल्याकडून दुःख दिले असेल त्या सर्वांची माफी मागा.

२. कधी त्यांच्याकडून दुःख मिळत असेल तरी त्यांना माफ करा कारण आपण पूर्वज आहोत. एखाद्या जन्मात आपणही त्यांना जरुर दुःख दिले असेल. माफ करा.

३. आभार मानावे, पूर्वसंचित संपले,

अनुभव मिळाला, मायेचे नवीन रुप समोर आले. माया काय आहे त्याविषयी समज वाढली ह्या करता आभार मानणे.

४. ज्या आत्म्यांना आपण सूक्ष्ममध्ये समोर आणत आहोत. त्यांच्या विषयी मनामध्ये अत्यंत श्रेष्ठ भाव निर्माण करायचे. हे जे सर्व आत्मे आहेत त्यांच्या जीवनातील सर्व विघ्न दूर होऊ देत. ह्यांची आध्यात्मिक प्रगती होऊ दे, ह्यांचे ब्रह्मचर्य व्रत अखंडित राहू दे. अत्यंत शुद्ध, पवित्र भाव त्या आत्म्यांकरता उत्पन्न करायचे आहेत. हे आत्मे आपले मुख्य अधिकारी असू शकतील, सहयोगी आत्मा असतील. आपल्यापेक्षा लहान पदावर काम करणारे असू शकतील, ब्राह्मण परिवारातील लोक असतील मधुबन निवासी असू शकतील हे काम रोजच करायचे आहे ज्यामुळे त्या आत्म्यांबरोबर पूर्व संचित नकारात्मक गोष्टी संपून जातील. नकारात्मक असलेली ओढ संपून जाईल. नकारात्मक आलेला अलिप्तपणा काही काळापुरता असतो. काही दिवसांनी त्यांच्यात परत ओढ निर्माण होते. उदा. पति-पत्नीमध्ये भांडण झाले काही दिवसांनी त्यांच्यातील प्रेम अधिक वृद्धिंगत होते. म्हणूनच भांडण करून कधी अलिप्त होता येत नाही. अल्पकाळाचे वैराग्य असते ते. बाबांवर प्रेम म्हणजेच ह्या परिवारावर प्रेम. ह्या परिवाराच्या प्रत्येक आत्म्यावर प्रेम. परिवाराचे नेहमी सहयोगी बना. बाबांनी २०१० च्या ज्ञान मुरलीमध्ये परदेशींना विचारले होते. तुमच्या पाकिटात काय आहे? सहयोग रुपी धन सर्वांना सहयोग द्या. इतके व्यग्र होऊन जा. ह्या ब्राह्मण परिवाराच्या प्रेमात. माफ करा, माफी मांगा, आभार माना. सर्वांविषयी श्रेष्ठ भावना ठेवा. जेव्हा आपण हे करायला सुरुवात कराल तेव्हा माया वारंवार सम्पर्क करण्याचा प्रयत्न करेल तिला नेहमी एकच उत्तर मिळेल. या मार्गावरील सर्व क्रमांक व्यग्र आहेत.

६) सहावा – बाबांवर प्रेम अर्थात् या यज्ञावर प्रेम – यज्ञ या शब्दाची व्याप्ती मोठी आहे. अमूक एक गोष्ट म्हणजे यज्ञ आणि अमूक एक गोष्ट म्हणजे यज्ञ नाही असे काही नाही. ह्या यज्ञाची कोणती भौगोलिक परिभाषा नाही. परंतु यज्ञातल्या प्रत्येक गोष्टीवर प्रेम. यज्ञावर प्रेम अर्थात् त्यातील भोजनावर प्रेम, तिथल्या इंधनावर प्रेम, तिथल्या प्रकाशावर प्रेम, तिथल्या विद्युतभारावर प्रेम, तिथल्या पाण्यावर प्रेम, प्रत्येक गोष्टीवर प्रेम. प्रत्येक खोलीवर प्रेम, ज्या खोलीत आपण राहिलो उद्या तिथे रहायला येणाऱ्यांसाठी जशी आपल्याला तिथे व्यवस्था मिळाली तशी स्वच्छ पूर्ववत जाताना करून ठेवणे. चादर पण स्वच्छ, चुरगळलेली नाही. प्रत्येक गोष्टीवर प्रेम, प्रत्येक साधनांवर प्रेम. आपल्यामुळे काहीही वाया जाऊ नये. इथले भोजन कधीही वाया जाऊ नये. येथे आलो होतो पुण्य कमवायला, थाळी मध्ये भरपूर घेऊन नंतर टाकून देणे, चहाचा पेला भरून घेतला आणि अर्धा टाकून दिला. आलो पुण्य कमवायला आणि पाप भरून घेऊन चाललो. मधुबनच्या प्रत्येक पोळीच्या तुकड्याचा हिशोब द्यावा लागेल. कारण ही ईश्वराची भूमी मधुबन आहे. त्यामुळे आपल्याकडून काहीच वाया जाऊ नये. अगदी औषधेपण. यज्ञातून जी साधने मिळतात ती आपल्यावर कमीत कमी खर्च व्हावीत ह्याचे पण भान असावे. कोणी वारंवार आजारी पडतो त्याचे संगोपन यज्ञातून होते, दिनचर्येत नक्कीच काही दोष आहेत, आरामात जगण्याची सवय झाली असेल, स्वतःवर नियंत्रण नसेल तर दोष चढतो. म्हणूनच या यज्ञावर प्रेम, निस्सीम प्रेम-सर्वस्व अर्पण करण्याची तयारी. मधुबन निवासी किंवा गृहस्थी असा, नेहमी लक्षात ठेवा माझे संगोपन यज्ञामधून होत आहे. तुम्ही पैसे कमवत असाल, पगार येत असेल परंतु हाच विचार नेहमी असू द्या हे बाबांचे आहे, बाबा मला देत आहेत. माझे संगोपन यज्ञामधून होत आहे. ह्यापेक्षा पण अधिक शक्तीशाली संकल्प ''मी स्वतः यज्ञच आहे'' बाबांवर प्रेम अर्थात् या यज्ञावर प्रेम.

***

## सुविचार

१) मृत्यूस घाबरतो, तो प्रत्येक वेळेस 'मृत्यू'चा विचार करताना मरतच असतो. - लेझेनेस्की

२) दुःख झाले असता ते उगाळत बसल्याने दुःख दुप्पट होते. - डिको



# स्वानुभवाचे बोल

ब्र.कु. महिब्बूल हुसेन, रायपूर

मुस्लीम भाऊ महिब्बूल हुसैन यांचा शिवबाबांबरोबरचा अद्‌भूत अनुभव

माझ्या शरीराचे नाव बी.के. एम्. हुसैन भाई असे आहे. मी रायपूर, छत्तीसगढ येथील रहिवाशी आहे. २०१३–२०१४ च्या आसपास मला बी. के. कल्पना कृष्णास्वामी भेटल्या. त्या रायपूर रेल्वे रिझर्वेशन ऑफीस मध्ये कामाला आहेत. त्यांच्याद्‌वारेच मला हे बाबांचे ज्ञान मिळाले. त्या मला छत्तीसगड येथील सेंटरवर घेऊन गेल्या. साधारण ३ वेळा मी त्या (सेंटरवर) सेवाकेन्द्रावर गेलो असेन, पण मला माझ्या काही प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. त्यामुळे आपण कुठेतरी भलतीकडेच तर आलो नाही ना! ह्या काय माझ्या प्रश्नांची उत्तरं देणार, मलाच सर्व काही माहीत आहे... अशा अशा विचारांनी मी स्वतःला फार ज्ञानी आहे असे समजू लागलो. त्यामुळेच असेही वाटायला लागले, की इस्लामपेक्षा श्रेष्ठ धर्म जगात कुठलाच नाही. अशाप्रकारे मी जवळ जवळ ३ वेळा सेवाकेन्द्रावर गेलो आणि परतलो. मी चित्र प्रदर्शनी वगैरे सगळ बघितलं. सर्व समजले होते. मी बहिणीला एक प्रश्न विचारला की, 'बहेनजी तुम्ही म्हणता की हिंदू धर्मात निराकाराचीच पूजा केली जाते, तसेच इथेही निराकार अल्लाह बद्दल सांगितले जाते. पण मला ब्रह्मा बाबांच्या फोटोबद्दल जरा शंका वाटते की जर तुम्ही लोकांना सांगता की निराकारच अल्लाह, भगवान या नावाने ओळखला जातो, तर मग हा फोटो तुम्ही का समोर ठेवता बरं! तुम्ही सांगता ह्या फोटोपुढे बसून ध्यान–योग करा. पण मी कुणाही साकारी मनुष्यमात्राला देव मानू शकत नाही, कारण आमच्या इस्लाम धर्मात अल्लाह नूर इलाही आहे. आम्ही लोकं कुणा देहधारीची पूजा करत नाहीत... ह्या आणि ह्यासारख्या अनेक प्रश्नांची योग्य ती उत्तरं न मिळाल्याने मी बी. के. सेवाकेन्द्रातून ३ वेळा माघारी आलो.

मग ती बहीण मला घेऊन रायपूरच्या चौबे कॉलनी सेंटरवर गेली. जे रायपूर शहरातले फार मोठे सेंटर आहे. इथल्या टिचर्स बहिणी वयाने आणि अनुभवाने जरा मोठ्या होत्या. आमचे धार्मिक स्थळ 'करबला तलाब' ह्या नावाने परिचित आहे. तिथे हजरत इमाम हुसैन नावाने तिथे एक दर्गा आहे. त्या दर्ग्यात मी साफसफाई आणि प्रार्थनेसाठी जायचो. असाच एक दिवस मी दर्ग्यातून नमाज पढून आहेर आलो. तेव्हा तिथेच मला कल्पना बहन भेटल्या. त्याच मला चौबे कौलनी सेंटरवर घेऊन गेल्या. तिथे मला एका बहिणीने प्रदर्शनी दाखवली, जी चौबे कॉलनीतच तयार केली गेली होती. त्यानंतर त्या म्हणाल्या की, 'भाऊ तुम्ही उद्यापासून रोज या आमचा ७ दिवसांचा साप्ताहिक कोर्स असतो. त्यात आम्ही तुम्हाला सर्व उपयुक्त माहिती देऊ.' मी म्हटलं, 'ठीक आहे.'

त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून मी नियमित ७ दिवस येऊन साप्ताहिक पाठ्यक्रम कोर्स पूर्ण केला. ५ व्या दिवशी एक विषय आला – 'जैसा अन्न वैसा मन' (जसे अन्न तसे मन), 'जैसा पानी, वैसी वाणी'. मी ह्याचा अर्थ विचारला. बहेनजी म्हणाल्या, 'तुम्ही लोकं बकरा कापता नं!' मी म्हणालो, 'हो तर मी बकरा कापतो, कुर्बानी म्हणून बकऱ्याची बळी देतो आम्ही.' मग बहेनजीनी ह्या बद्दल मला विस्ताराने माहिती दिली. मला ते अगदी खरं वाटल. तुम्हाला सांगतो, जी जेव्हा बकऱ्याची कुर्बानी करायचो, तेव्हा अक्षरशः रडायचो–दुसरीकडे एकांतात जाऊन मी अल्लाची ही क्षमा मागायचो आणि त्या बकऱ्याची ही. की मी नाहक तुझा बळी घेतला. (बळीचा बकरा).

इस्लाम धर्मात खूप काही गोष्टी आहेत– जसे बळी, कुर्बानी तर आहेच आगीवर चालणे वगैरे – मी जवळ जवळ १५ वर्षे१० फुटांच्या जळत्या

कोळशांवरुन (अंगार) चाललो. मोहर्रमच्या दिवसांत मी तलवार, साखळी (जंजिर) ब्लेड, चाकू ह्यासारख्या साधनांनी माझ्या शरीरावर जागोजागी घाव करून घ्यायचो. हे सर्व धार्मिक विधी करत असताना ही मनातल्या कुठल्या तरी कोपऱ्यात हा प्रश्न असायचाच की हे सर्व का बरं करायचे? ह्याचा फायदा तरी काय? आमच्या समाजातील प्रत्येक व्यक्ती ह्या दिवसांत १-२ बाटल्या रक्त वाया घालवते. तर अनेक व्यक्ती मिळून किती रक्त वाया जात असेल बरें! माझे अंतर्मन मात्र हे म्हणायचे की 'हे रक्त असेच फुकट (वाया) घालवण्यापेक्षा रुग्णालयात दिल्यास कुणा मनुष्याला जीवन दान मिळू शकेल. ह्या माझ्या विचारांबद्दल मी आपल्या मौलाना लोकांशी चर्चा करायचो, त्यांना म्हणायचो, 'मौलाना साहेब मला असे वाटते, की जर हे रक्त आपण वाया घालण्यापेक्षा दान केले, तर अल्लाह जास्त प्रसन्न होईल नाही का!' पण मौलाना मला दटावायचे आणि गप्प करायचे. म्हणायचे कृपा करून अशा प्रकारच्या गोष्टी कुठे बोलूही नकोस. कुणी ऐकले तर इस्लाम धर्मातून तुला बाहेर करतील. तरीही मनातील उठणाऱ्या ह्या आणि ह्यासारख्या प्रश्नांची उत्तरं मात्र सापडायची नाही.

मी साप्ताहिक पाठ्यक्रम पूर्ण केला आणि ५ व्याच दिवशी बाबांनी माझ्या बुद्धिचे कुलुप उघडले. मला असे वाटले मला ते सर्वच ज्ञान प्राप्त झाले आहे, जे मागील ४२ वर्षांपासून इस्लाम धर्मात राहून उलगडण्याचा प्रयत्न करत होतो. ७ दिवसांच्या कोर्सनंतर मी बहेनजींना विचारले, 'आता पुढे काय?' 'आपल्या इथे रोज मुरली ऐकवली जाते, ज्यात गीता कुराणाचे सारे रहस्य, सार दडलेले आहे, जे साक्षात् शिव परमात्मा ऐकवतात. तसे पाहिलं तर कोर्स जरी झाला असला, तरी बाबा नक्की कोण आहेत, हे मला तेवढेसे स्पष्ट झालेले नव्हते. फक्त एवढं कळले होतं, की हे लोक अल्लाह, भगवान ह्यांनाच बाबा म्हणतात. तसेच ब्रह्मा बाबांच्या फोटोलाही बाबा म्हणतात.

चौबे कॉलनीतल्या त्या सेंटरवर मी ८ व्या दिवशी (कोर्स झाल्याच्या) मुरली क्लास ऐकायला बसलो. क्लासनंतर मी ध्यानात बसलो. बहिणीने म्हटले बाबांच्या डोळ्यात बघत राहा. मी इस्लाम धर्मातून आलो असल्याने मी ब्रह्मा बाबांच्या फोटोकडे बघायचो नाही. मी फक्त निराकार शिवबाबांच्याकडेच बघायचो. पण माझ्या हे ही ध्यानात आलं, की बाबांचे ते पवित्र बोलके डोळे मला सारखे सारखे आकर्षित करायचे आहेत. मग मी ही त्यांच्या डोळ्यांत हरवून गेलो. एक वेळ अशी आली की ब्रह्मा बाबांच्या डोळ्यांत बघता बघता माझे डोळे बंद झाले आणि मी एका अनोख्या जगात जाऊन पोहोचलो. हा माझा व्यक्तीगत अनुभव आहे. एखादा नशेबाज नशा करतो, तेव्हा त्याला कुठलीच शुद्ध राहत नाही. तो आपल्याच दुनियेत मस्त असतो. मलाही अशीच काहीतरी नशा आली होती. वेगळ्याच दुनियेत मी जगायला सुरुवात केली होती.

ब्रह्माकुमारीज् मध्ये जाण्याचं महत्वाचं कारण म्हणजे ७ दिवसांच्या साप्ताहिक कोर्सनंतर मुरलीनी त्यानंतरचे ते अलौकिक ध्यान-बाबांच्या डोळ्यादूवारे जी नशा आली, ती केवळ अवर्णनीयच म्हणावी लागेल. ब्रह्मा बाबांच्या डोळ्यांत बघितले की मी एका अदृश्य अनोख्या जगताच्या सफरीवर जात असे, जे एक लाल लाल प्रकाशाचे जगत होते. ह्या गोष्टींचा मला फारसा काही काय काहीच अनुभव नव्हता. तरी मी एका प्रकाशाच्या त्या जगतात मी एकटाच असायचो बाबांबरोबर. ह्या ठिकाणची जी शांतीची अनुभूती आहे ती शब्दांत वर्णन करू शकणार नाही. मी काय अगदी कुणीच! हे फक्त ह्याच मोहापायी मी बी. के. सेवाकेन्द्रात जायला सुरुवात केली की सेंटरवर जो १-२ तास मी व्यतीत करीन त्या वेळात मी त्या गहन शांतीचा अनुभव करी. त्या शांती देशाचा भाग होईन. मी २०१४ पासून अगदी नियमितपणे ब्रह्माकुमारीत जाऊ लागलो. मग मला पुढच्या पायरीवर सांगितले गेले की तुम्हाला कांदा-लसूण, अंडी, मटण, मासे खाता येणार नाहीत. ते सोडून शुद्ध शाकाहार करावा लागेल. ह्या ही गोष्टीवर मी अति गहन विचार करायला सुरुवात केली. मला असे दिसून आले की माझ्या समाजातील व्यक्ती फार फार तापट असतात. छोट्या गोष्टींवर भांडण-तंटे, मारामाऱ्या करणे, शिव्या देणे, शिवीगाळ करणे हे संस्कार अर्थातूच माझ्यातचही होतेच. जसे कुणी माझ्या गाडीसमोर आले, टक्कर झाली तर लगेच गाडीवरुन उतरून त्याला शिव्या देणे, मारणे हे मी सर्रास करायचो. मनात विचार आला की खरंच हे सर्व असे अतिरेकी वागणे अन्यायाचा प्रभाव आहे का बरं! आम्ही हे असे अमानवीय खातो, ते खरंच खाणे योग्य आहे का? हिंदू लोकं पण भांडण तंटे करतात, पण ते लगेच

हमरी तुमरी (शिव्या शाप) वर येत नाहीत. ते 'भाऊ क्षमा करा हं, तुम्हाला लागलं का? माझी चूक झाली असं हात जोडून सांगतात. पण मुसलमानांमध्ये ही गोष्ट क्वचित असते किंवा नसतेच म्हटले तरी चालेल. हा माझा व्यक्तीगत अनुभव आहे बरं का! कुणी ह्यावर आक्षेप घेण्याचं कारण नाही.

अजून काही स्वतःबद्दल सांगायचं झाल्यास मी थोडासा हट्टी (हटवादी माणूस आहे). कुणी आव्हान केले, तर मी ते लगेच स्वीकारतो आणि ते तसं करून ही दाखवतो. कल्पना बहन मला म्हणाल्या 'भाऊ, तुम्ही न आता थोडं खाण्यात शुद्धता-सात्विकता आणा. तुम्हाला जगण्यात फार आनंद वाटेल. गोष्टी अजून चांगल्या होऊ लागतील! मी 'बरं' म्हटलं 'प्रयत्न करतो.' एकदा असेच एक लग्न समारंभात गेलो असता तिथे जेवणाचा प्रसंग आला. जेवणात चिकन बिर्याणी होती ते माझ्या जीवलग मित्राच्या भाच्याचे लग्न होते. लग्नाला पोहोचायला मला अंमळ उशीरच झाला होता तर जेवळ जवळ जवळ संपल्यात जमा होते. तरीही मला त्यांनी थोडी चिकन बिर्याणी वाढलीच. त्या ताटाकडे बघताच मला कसेसेच झाले मनात एकदम घृणा दाटून आली. नको नको झालं शेवटी फक्त भातच जेवलो.

घरी आल्यावर मला मुरलीतल्या बाबांच्या गोष्टी अन्नाबद्दलच्या आठवायला लागल्या. मग मी खूप खोलवर विचार करायला लागलो की खरंच अन्नाचा मनावर प्रभाव पडतो का बरं! असं जर का असेल, तर सोडून बघूया आपण (आव्हान घेतले). आता सर्वात आधी मी बिर्याणीचा त्याग केला. तसेही मी ती कधी कधी खायचो, तरीही आता सोडली पूर्णपणे. मग दुसरी गोष्ट बाबांनी म्हटले, 'मुलांनो, कांदा-लसूण यांसारख्या तामसिक पदार्थांचा नैवेद्य देव-देवतांना लागत नाही. मी लगेच अमृत वेळेला बाबांना विचारले, 'बाबा कांदा-लसणाच्या वापराने नुकसान काय होते ते सांगा. वाचक हो माझ्या जीवनातील सर्वात महत्वाचा अनुभव म्हणजे मी कुणाही भावा-बहिणी किंवा दादी-दीदींचे क्लासेस ऐकून मी प्रभावित झालो नाही. परंतु मी हेच मानून चाललो, की जर ईश्वराचं सत्य ज्ञान, त्याची प्राप्ती जर मला झाली असेल, तर त्याने स्वतःच मला सर्व गोष्टी समजून द्याव्या. मला ह्या ज्ञानाची 'त्या' ने प्रचिती द्यावी. बाबांनीच थेट उत्तर द्यावं (मुरलीतून) की हे खाल्याने हे नुकसान होते. ह्याने हा फायदा होतो. अमृतवेळेस बाबांना प्रश्न करताच बाबा म्हणाले, 'मुला, कांदा-लसूण हे एक प्रकारचे तामसिक कंद आहेत. ज्याच्या केवळ चिरण्यानेच डोळ्यात जळजळ होऊन पाणी येते. त्याच्या सेवनाने अंगात उष्णतेचे प्रमाण वाढते आणि ह्या अवाजवी गर्मीमुळे मनुष्य एक प्रकाराचे कुकर्म करतात.' मी विचारले, 'कोणते कुकर्म?' बाबा महणाले, 'ती उष्णता काढण्यासाठी मनुष्यामध्ये क्रोध उत्पन्न होतो. मग भांडण, मारामाऱ्यांना सुरुवात होते. जरी तुमच्यात भांडणाचा संस्कार नसला, तरी दुसऱ्या अजून एका विकाराची उत्पत्ती होते, ते म्हणजे कामवासना जागृत होते. जो मनुष्याला अजूनच रसातळाला घेऊन जातो.'

मी अल्लाहचे, परवरदिगारे-ए-आलम बाबांचे लाखो-करोडो वेळा आभार मानतो, की जन्मल्यापासून आजतागायत की वाईट वाटांवर कधीच गेलो नाही बीडी, पान, सिगरेट, गुटखा ह्यांसारख्या व्यसनांपासून कायम दूर राहिलो. अनेक वाईट संगतीत राहिलो तुम्हाला सांगतो मी वेश्यांच्या बाजारात ही गेलो मित्रांबरोबर. रायपूरच्या बाहेर पण मी कधीच वाईट संगतीला चिकटून नाही राहिलो. मला वाटते ह्याच सर्व गोष्टी बघूनच बाबांनी मला स्वतःच्या कुशीत घेतले असावे. १ वर्षाच्या आत मी माझ्या जेवणात शुद्धता आणण्यात यशस्वी ठरलो. हळूहळू कांदा लसूण ही सोडले. पण त्या आधी मांसाहार-अंडे, मटण, मासे हे ही त्यागले.

कल्पना बहिणीने म्हटलं होतं की तुम्ही अल्लाहशी बोलू शकता, त्याला भेटू बघू शकता. मग हे आव्हान मी कल्पना बहीण आणि प्रत्यक्ष बाबांना ही दिले की बाबा खरंच जर तू प्रत्यक्षात येतोस, भेटतोस, दिसतोस, बोलतोस तर - (कारण हा असा विचार सामान्यांच्या मनात ही येणार नाही कठिण वाटते) क्या कहने! बहिणीने म्हटले, 'भाऊ थोडा त्याग करावा लागेल ह्या असाध्य वाटणाऱ्या गोष्टीबद्दल तो म्हणजे झोपेचा अमृतवेळेला २ वाजता उठून तुम्ही बाबांशी गुजगोष्टी करायला सुरुवात करा. अमृतवेळेला आम्ही मुस्लीम नमाज-ए-शक ह्या नावाने ओळखतो म्हणजे मध्यरात्री उठून पढावयाचा नमाज यात आम्ही अल्लाहशी बोलतो. मी हे ही आव्हान स्वीकारले. २ वाजता अमृतवेळेला उठण्यास सुरु केली. ६ महिन्यांच्या अथक योगाभ्यासानंतर पहिल्यांदाच मला महाज्योतीचा साक्षात्कार झाला. हा एक दिव्य साक्षात्कार होता प्रकाशाचा.

ही गोष्ट मी कल्पना बहेनजीला

सांगितली, 'मी एका खूप पांढऱ्या स्वच्छ प्रकाशाचा अनुभव केलाय, जो प्रकाश येतो आणि जातो. क्षणात लुप्त होतो. त्या म्हणाल्या, 'भाऊ खूप छान दिशेने तुमचा हा प्रवास सुरु आहे, तुम्ही असाच पुरुषार्थ चालू ठेवा.' मग मीही दुप्पट उत्साहाने माझे प्रयत्न चालू ठेवले. काही दिवसांनी मला ब्रह्माबाबांचा ही साक्षात्कार झाला (फरिश्ता) देवदूताच्या रुपात. त्यावेळी मला थोडे विचित्र वाटले भीतीसदृश भावना उत्पन्न झाल्या की हे काय कुणी आत्मा भूत प्रेत आहे की काय, रात्रीच्या अंधारात तसे वाटले. पण हळूहळूच्या अथक प्रयत्नांत मला खूप सारे साक्षात्कार झाले. सगळ्यात महत्वाचा अनुभव सांगायचा झाल्यास स्वानुभवाने हेच म्हणेन की जर खऱ्याखुऱ्या मनाने तुम्ही कोणताही प्रश्न अमृतवेळेला, रात्री बाबांना विचारल्यास बाबा तात्काळ त्याचे उत्तर दुसऱ्याच दिवशीच्या मुरलीत देतो. होय हे अगदी खरे आहे. ही फार मोठी गोष्ट आहे. तुम्ही विचार करा मी अमृतवेळेला बाबांना काही विचारताच दुसऱ्याच दिवशी तशीच, त्याच प्रश्नाच्या उत्तराची मुरली कशी काय बुवा छापून येते. हे एक रहस्यच म्हणावे लागेल. ज्या ज्या वेळी उत्तरे मिळायची, माझ्या आनंद आणि आश्चर्य दोन्ही गोष्टींचा पारावार राहत नसे. म्हणायचो 'बाबा, अहो कालच तर मी ही गोष्ट विचारली होती तुम्हाला, तुम्ही लगेच कसे हो उत्तर दिलंत! हळूहळू ही स्पष्ट जाणीव व्हायला लागली की मी अल्लाहच्या खूप खूप जवळ जवळ जातोय की माझे प्रत्येक बोल प्रश्न त्याची चपखल उत्तर द्यायला तो तयारच असतो. अजून काय हवे एखाद्याला? इथे ही एका नशेचा अनुभव झाला. ज्यामुळे अमृतवेळा आणखीनच शक्तीशाली व्हायला लागली. मी २०१४ पासून (अविरत) सातत्याने अमृतवेळा करतोय. २०१४ ते २०२३ ह्या दरम्यान १२ ते १४ वेळा माझी अमृत वेळा चुकली असेल. तसेच सकाळच्या सेवाकेन्द्रावरच्या क्लासलाही हजेरी लावतो सकाळी ६ वाजता.

त्यानंतर मी बाबांकडून शक्ती मिळाव्यात ह्या उद्देश्याने म्हटले, 'बाबा मी लोकांची सेवा करू इच्छितो. कारण मी जेव्हा भक्ती मार्गात होतो, तेव्हा मी थोडी तंत्र-मंत्र (जादू-टोणा) ची विद्या ही शिकायचो, पुस्तके वाचून वाटायच की जेणेकरून अल्लामियाँ मला कुठलीतरी ताकद, शक्ती देईल, ज्यामुळे मी लोकांची मदत (उद्धार) करू शकेन. भक्तीमार्गापासूनच माझा सेवाभाव होता. मी बऱ्याच सेवाभावी संस्थांशी निगडीत आहे. मनुसेवार्थ दिल्लीतून मला एक बक्षिस ही मिळाले. 'मानव रक्षक सम्मान' मी अखिल भारतीय मानव निगराणी समितीत उपाध्यक्ष म्हणून ही पद भूषवलेले आहे. मी माझ्या जीवनाचा जास्तीत जास्त काळ समाजसेवेत व्यतीत केला आहे. पण तरी मनात एक सुप्त इच्छा असे की मला कुठलीतरी (रुहानी ताकद) आत्मशक्ती मिळावी. त्यासाठीच मी जे वर सांगितले की पुस्तकांतून की तंत्र-मंत्र विद्या शिकायचो.पण खरंच सांगतो, त्या सर्वांत मला काहीच गवसले नाही.

तरीही इथे मला नमूद करायला आवडेल की बाबांचे बनल्यानंतर केवळ एकाच वर्षात इतकी शक्ती आली. प्रगती झाली की पुरुषार्थ योग्य मार्गाने जात असल्याची जाणीव पदोपदी होतेच. मी जे बोलतोय तेच अगदी तसच घडतेय. खरंच चमत्कार वाटतोय ना! ह्यालाच बाबा म्हणतात संकल्पांची सिद्धि. संकल्प केला आणि तो सिद्ध झाला. कारण सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे बाबा म्हणतात, तुम्ही पवित्र बना पवित्रतेच्याच आधारावर तुम्ही बाकी शक्ती ही प्राप्त कराल. म्हणूनच मी सर्वात आधी पवित्रतेचा हा महागुण धारण केला. पण तरीही मी अनेक वर्षे अनभिज्ञच होतो की पवित्रता नेमके कशास म्हणतात? ह्या ही वेळेस मी थेट बाबांनाच विचारले, 'बाबांनी पवित्रतेवर खूप मुरल्या चालवल्या, फक्त ब्रह्मचर्याचे पालन करणे म्हणजे पवित्रता नसून ब्रह्माचारी व्हायला हवे म्हणजेच ब्रह्मा बाबांसारखे आचरण मन्सा-वाचा-कर्मणा पवित्रता धारण करायला हवी. हे खरचं थोडं अवघड वाटत असलं तरी बाबांवरील अतिप्रेमामुळे ते सहज साध्य झाले. तसेच माझा आव्हान स्वीकारण्याचा स्वभाव, जिद्द होती की मला कुठलीतरी आत्मशक्ती मिळावी जनसेवार्थ. मी ह्या ही गोष्टींवर काम करायला सुरुवात केली आणि बाबांकडून हळूहळू ती शक्तीही प्राप्त केली. संकल्पाची सिद्धि मी जे बोलाचो ते खरचं तसेच व्हायला लागले. धन्यवाद बापदादा.

***



# अलौकिक व्यक्तिमत्त्व

**ब्र. कु. राजू मुरली विभाग, मधुबन**

दादी जानकीजींचे व्यक्तित्त्व म्हणजे त्याग, तप आणि सेवा या तिन्हीचे आदर्श प्रतीकच होते. देशोदेशी परमात्म संदेशाची ध्वजपताका फडकविणाऱ्या दादीजींनी सगळ्यांच्या हृदयसिंहासनावर राज्य केलं. एकव्रता बनून (इकॉनॉमी) काटकसरीचे जीवन कसे असावे त्याचा आदर्श निर्माण केला ब्रह्मावत्सांकरिता. संस्थेच्या सुरुवातीच्या काळात शिवबाबांनी अनेकांची मूळ नावे बदलून संन्यासी जसे संन्यास धर्म स्वीकारल्यावर नाव बदलतात तशी नवीन नावे ठेवली. मात्र दादीजींना बाबांनी कायमच 'राजा जनक' नावाने संबोधले. जनक राजाचे वैशिष्ट्य म्हणजे विदेह अवस्था आणि विश्वस्त मनःस्थिती – दादीजींच्या जीवनात या दोन्ही गोष्टी पूरेपूर दिसून येत. वैज्ञानिकांच्या चाचणीद्वारे तर त्यांना 'स्थिर मनाच्या स्वामिनी' असा किताबही मिळाला होता.

**ईश्वरी सेवेत अथक :** सिंध हैदराबाद–कराची येथील चौदा वर्षांच्या तपश्चर्येनंतर संस्था, माऊंट आबूला स्थलांतरीत झाली. त्यानंतर सेवेस प्रारंभ झाला आणि 'रमता योगी' या बिरुदाप्रमाणे दादीजी भारतभर सेवा करीत हिंडल्या. सेवेसाठी प्रवासाची तुटपुंजी साधने असतील तिथे पायीदेखील हिंडल्या. 'चालणाऱ्याचे भाग्यही चालते' असे म्हणतात; पण दादींच्या बाबतीत तर 'चालणाऱ्याचे भाग्य काही कोटीत वृद्धींगत होते' असे म्हणावेसे वाटते. त्यांनी अनेकांना या ज्ञानमार्गात दृढनिश्चयी बनविले, यज्ञस्नेही बनविले. लहानपणी त्या 'दादा वासवानींच्या' सत्संगात जात, नंतर शिवबाबांचा परिचय मिळाल्यावर त्या बाबांकडे आकृष्ट झाल्या आणि नवी आध्यात्मिक वाटचाल सुरू झाली. 'दादा वासवानीशी' असलेला स्नेह मात्र कायम टिकून होता. याकारणास्तव सिंधी समाजाची सेवा करण्यासाठी दादींना, बाबांनी पुण्याला पाठविले. त्यातून अनेक सिंधी भाऊ–बहिणी, ईश्वरी ज्ञानाचा नित्य लाभ घेऊ लागली. त्या मंडळींच्या मनातील संस्थेविषयीचे गैरसमजही दूर झाले. त्यातूनच परदेशातील सेवेचे बीज रुजले.

**टीचर्स ट्रेनिंगमधील अग्रणी :** दीदी मनमोहिनी आणि दादीजींमध्ये अलौकिक स्नेहबंध होता. बाबा अव्यक्त होण्यापूर्वी त्यांनी दादींना सांगितल्याप्रमाणे ट्रेनिंग सेंटर बांधून झालं आणि लगेच बाबा अव्यक्त वतनवासी झाले होते. ट्रेनिंगच्या सुरुवातीला दादी चन्द्रमणी व दादी जानकी या दोघींनी ही धुरा सांभाळली. त्यातूनच पुढे आलेल्या अनेक बहिणी आज मोठमोठ्या जबाबदाऱ्या निभावताना दिसतात.

मी व्यक्तीशः दादीजींना प्रथम १९७२ मध्ये भेटलो. दीदी मनमोहिनींनी माझा दादीजींशी परिचय करून दिला. दादीजींकडे ज्ञानरत्नांचा खजिनाच होता. बाबांच्या ज्ञानमुरलीवर गहन चिंतन करून त्या (दादी) क्लासेस करत. त्याचे सार काढून मी दीदींना देत असे. मला कायमच या सगळ्यात काही ना काही नावीन्य मिळत गेले. दादींचे बाबांविषयीचे निरतिशय प्रेम, त्यांचे साधनेतील अनुभव याची टिपणं काढणे, ते ऐकणे ही माझ्यासाठी पर्वणीच होती. त्या लंडनला गेल्या आणि तिथून पुढल्या काळात तेथील यज्ञवत्सांना एकात्मतेच्या सूत्रात त्यांनी छान गुंफलं. निःस्वार्थ स्नेह आणि ईश्वरी स्नेहयुक्त संगोपनातून तेथील यज्ञवत्सांचे छान भरणपोषण झाले. त्यांचे आत्मिक प्रेम अलौकिक होते, ते देहभानाच्या निम्न पातळीवर कधीच उतरले नाही.

**स्वतःसाठी एकही पैसा खर्च होऊ नये :** आधी उल्लेख केल्याप्रमाणे दादीजींचे जीवन अतिशय साधे आणि काटकसरीचे होते. स्वतःच्या कपड्यांवरही त्या फार खर्च करू देत नसत. रोज कुणाला ज्ञानदान केल्याशिवाय मी नाश्ता करणार नाही

हा त्यांचा निश्चय होता. कपड्यांची एखादी जोडी घेऊन त्या सेवेसाठी अनेकदा बाहेर पडल्या. भौतिक साधन सुविधांची त्यांनी कधीच तमा बाळगली नाही. संपूर्ण एकनिष्ठ, आज्ञाधारक आणि प्रामाणिक बनून यज्ञसेवा केली. त्यांच्याकडे कुणी काही सहकार्य म्हणून वस्तू किंवा धन आणून दिले, तर आधी ते मधुबनला पाठवावे हा त्यांचा कटाक्ष असे. माझ्या अंत्यविधीस एकही फूल नको आणि अनाठायी खर्चही नको असे त्या नेहमी म्हणत आणि खरोखरीच लॉकडॉऊनमुळे तसेच घडले.

**कार्यपूर्तीची त्वरा :** दादींनी कधीही कुठलेही कार्य अपूरे ठेवले नाही. आलेल्या पत्रांना त्वरीत उत्तरे देत. त्या मला सांगत, 'अमुक अमुक व्यक्तीला आजच्या आज उत्तर पाठव', आजच्या टपालात याचे उत्तर गेले पाहिजे. त्यांच्याकडे कुणी धन सहयोग दिला तर तो चेक किंवा रक्कम तात्काळ अकाऊंटस्‌मध्ये जमा करत. 'रात्री झोपताना आपल्याला शाश्वती देता येत नाही की उद्याची सकाळ आपण पाहू की नाही' असं त्या नेहमी म्हणत. माझ्या देहत्यागानंतर माझ्या कपाटात एक रुपयाही सापडता कामा नये, त्याकरिता जे आहे तो योग्य ठिकाणी योग्य वेळसच जावे. यासाठी त्या दक्ष असत.

मी दादी प्रकाशमणीजींसोबतही सेवा केली. त्यांच्या पश्चात् दादी जानकीजींसोबत सेवा करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले. दादीजी सदैव कार्यमग्न राहूनही हलक्या रहात असत.

मी त्यांच्याकडे गेलो की त्या हातातले काम बाजूला ठेवून मला वेळ देत. कुणाच्या आजारपणाविषयी काही कळलं तर त्यास तात्काळ उत्तर देण्याची सूचना करत. कधी कधी दहा-वीस पत्रांना एकाच वेळेस काय काय उत्तरे द्यायची ते सांगत. पत्रासोबत काही ना काही ज्ञानबिंदूही समाविष्ट करण्याचा त्यांचा आग्रह असे. त्यांच्या उत्तराची टिपणं घ्यायला बसलो तर म्हणत, 'लिहू नकोस, ध्यानपूर्वक ऐक आणि नंतर जाऊन लिही.' अशा प्रकारे माझी एकाग्रता त्यांनी वाढविली. त्यांच्या वतीने काही पत्रं लिहून नंतर त्यांना त्या पत्रांचा मसुदा दाखवायला गेलं की म्हणत, 'तू माझ्या मनातले भाव चांगले जाणतोस.' असं बोलून त्या माझा हुरुप वाढवित असत. एखाद्या पत्रात बदल करायचा असेल तर फार प्रेमळ आणि रेशमी सूचना करत. 'यात हे असं घातलंस तर बरं होईल' इतकच म्हणत. दुसऱ्या कुणी त्यांच्या वतीने काही पाठवणार असेल, तर माझ्याकडून तपासून घ्यायला पाठवत इतका विश्वास दाखवला.

अव्यक्त बापदादांनी त्यांचे वर्णन करताना म्हटले होते, ''ही गुणांचं दान करणारी आहे, कर्मातून गुणदान करते. सगळ्यांना गुणी बनविण्यात तरबेज आहे. त्यांची स्वतःची प्रकृती वर-खाली झाली तरी अमृतवेळेचा योग, संध्याकाळचा योग व क्लास हा नित्यक्रम कायम पहायला मिळाला.

**व्यर्थ गोष्टींपासून कायम मुक्त :** अनेकजण दादीजींना विचारत,'या वयात तुमच्याकडे इतकी उर्जा येते तरी कुठून?' त्या म्हणत, 'मी आपली शक्ती, वेळ काहीही व्यर्थ घालवत नाही. एखाद्या पत्रात व्यर्थ फापटपसारा असेल तर त्या म्हणत, 'ते सोडून पुढे जा, ज्ञानबिंदूंची देवाण-घेवाण काय त्यावर लक्ष देऊ. मला व्यर्थ गोष्टी ऐकूच येत नाहीत.' अशा दादीजींकडून अगणित गोष्टी शिकलो, त्याची मोजदाद करणेच कठीण आहे. त्यांच्या पाऊलखुणांवर चालून बाबांच्या श्रीमताचे पालन केल्यानेच या जीवनात प्रगती साधता येईल आणि मी तेच आत्तापर्यंत करत आलोय. पुढेही करतच राहणार. अशा महान आत्म्यास माझी ही स्नेह सुमनांजली!

***

## मनाची एकाग्रता

आध्यात्मिक साधना हीच मानवी जीवनाचा मुख्य आधार आहे. आध्यात्मिकता म्हणजे अधिकाहून अधिक आत्मिक स्थितीचा अनुभव घेणे. अंतर्मुखता हीच आध्यात्मिक जीवनाची प्रथम पायरी आहे. जिथे अंतर्मुखता आहे तेथे मनाची एकाग्रता आहे.

**संकलक- ब्र.कु.शिल्पा, कोल्हापूर**



# राजयोग ध्यान, तणाव व्यवस्थापनाचा प्रभावी मार्ग

ब्र.कु. प्रफुलचंद्र, सॅनदिएगो

आजच्या काळात तणाव आणि चिंता ही एक जागतिक समस्या बनली आहे. आज तणावमुक्त व्यक्ती क्वचितच असेल. आज तणाव व्यवस्थापनासाठी अनेक प्रकारच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि योगिक पद्धती तसेच वैद्यकीय उपचारांचा वापर केला जातो. त्यांचे थोड़े-फार फायदे ही होत आहेत. परंतु या सर्वांसोबत जर राजयोग ध्यानाचा वापर केला तर खूप चांगले परिणाम मिळू शकतात.

राजयोग आपल्याला मनाचे आंतरिक परीक्षण करण्यास प्रोत्साहित करतो आणि तेही टीकेने नव्हे तर प्रामाणिकपणाने आणि सहानुभूतीने. या ध्यानाचा सराव केल्याने आपली आंतरिक उपचार शक्ती जागृत होऊन आपल्याला तणाव, चिंता, अस्वस्थता आणि भीती यापासून मुक्ती मिळते. त्याच वेळी, ते आपले मन सकारात्मक आणि सर्जनशील बनवते. त्यामुळे ताणतणाव व्यवस्थापनासाठी आपण काहीही केले तरी त्यासोबतच दिवसातून दोनदा नियमितपणे १५-१५ मिनिटे राजयोग ध्यानाचा सराव केला तर नक्कीच आपण तणाव आणि चिंतामुक्त राहू शकतो.

आपण या राजयोग ध्यानाचा सराव आपल्या शरीर आणि मनाच्या विश्रांतीने शिथिलीकरणाने सुरू करू, त्यामुळे आपले मन शांत, स्थिर आणि केंद्रित राहण्यास मदत होईल. शरीर सैल सोडून आरामदायी स्थितीत बसा. दोन्ही नाकपुड्यांमधून सुमारे दीड सेकंदात किंवा ४ संख्या मोजे पर्यंत



श्वास घ्या. त्यानंतर, अर्धा किंवा पाऊण सेकंद किंवा २ संख्या मोजे पर्यंत फुफ्फुसात श्वास रोखून ठेवा. त्यानंतर, दोन सेकंदात किंवा ५ संख्या मोजे पर्यंत, दोन्ही नाकपुड्यांमधून हलके श्वास सोडा. नंतर श्वासोश्वासाने दुसरे नवीन चक्र सुरू करण्यापूर्वी अर्धा ते एक चतुर्थांश सेकंद किंवा २ संख्या पर्यंत मोजा.

श्वास घेण्याची संपूर्ण प्रक्रिया पोटातूनच करावी लागते. म्हणूनच त्याला ओटीपोटात श्वसन देखील म्हणतात. जेव्हा तुम्ही श्वास घेता तेव्हा हळूहळू पोट बाहेर येऊ द्या आणि जेव्हा तुम्ही श्वास सोडता तेव्हा पोट आत जाऊ द्या. श्वासाची लय सेट केल्यानंतर, तुमचे संपूर्ण लक्ष तुमच्या श्वासावर केंद्रित करा. साक्षीने, शांततेने, प्रेमाने श्वास आत आणि बाहेर पहा. श्वासावर लक्ष केंद्रित करा आणि दोन्ही नाकपुड्यांच्या आतील भिंतीवर श्वासोच्छवासाच्या प्रवाहाचा स्पर्श आणि संवेदना अनुभवण्याचा प्रयत्न करा. जर हे अनुभवले असेल तर तुमचे लक्ष केंद्रित झाले आहे असे समजून घ्या. आता श्वासावरची एकाग्रता वाढवली तर दुसरा अनुभव येईल. तुम्ही जो श्वास घेत आहात तो थोडा थंड आहे आणि जो श्वास सोडत आहात तो थोडा गरम आहे. शांत चित्ताने, आता येणाऱ्या श्वासाचा थंडपणा आणि नाकपुडीच्या आतील भिंतीवर सोडणाऱ्या श्वासाची उबदारता अनुभवण्याचा प्रयत्न करा. जर हे अनुभवले असेल तर समजा की तुमचे मन शांत, स्थिर आणि एकाग्र झाले आहे. तुमच्या पायापासून डोक्यापर्यंतच्या सर्व स्नायूंना आराम द्या आणि विश्रांतीचा अनुभव घ्या.

ध्यानाच्या सरावात, स्वयंसूचना आणि व्हिज्युअलायझेशनच्या (Visualization) खालील पद्धतीचा अवलंब करा:

तुमचे लक्ष श्वासापासून दूर घ्या आणि मेंदूच्या मध्यभागी आणि

कपाळाच्या मागील भागावर लक्ष केंद्रित करा. या ठिकाणी, मनाच्या डोळ्याने स्वतःला स्वयंप्रकाशित बिंदूच्या रूपात पहा. त्याच बरोबर आपल्या भौतिक शरीराचे देखील मनात चित्रण करा. यानंतर, स्वतःला खालील स्वयंसूचना ठामपणे द्या.

- पंच तत्वांनी बनलेल्या या नाशवंत भौतिक देहापासून वेगळा, मी एका चमकत्या ताऱ्यासारखा, जिवंत, ऊर्जा आत्मा आहे....
- मी अनंत काळापासून अस्तित्वात आहे आणि अनंतकाळपर्यंत राहणार आहे....
- मीच अविनाशी आत्मा आहे....
- मुळात, मी शांत स्वरूप आत्मा आहे.....
- शांती हा माझा जन्मजात आत्मधर्म आहे.....
- मी शांततेने परिपूर्ण आहे.....

शांतीचा सागर, सर्वशक्तिमान शिव परमात्माची मी संतान, मास्टर सर्वशक्तिमान आहे. परम धाम, जे शांतीचे निवासस्थान आहे, ते माझ्या आत्म्याचे खरे निवासस्थान आहे.... अशा शांतिधामातून येणारा आत्मा, मी अशांत कसा असू शकतो ?.... याशिवाय, पवित्रता, प्रेम, आनंद हे माझ्या आत्म्याचे मूलभूत संस्कार आहेत, ते माझ्यामध्ये प्रकट होत आहेत. हे मला सहज जाणवत आहे...

मला प्राप्त झालेल्या आध्यात्मिक ज्ञान आणि राजयोग मुळे माझ्यात एक दैवी विवेक जागृत झाला आहे..... मला एक नवीन सकारात्मक दृष्टी मिळाली आहे......माझे जीवनाकडे आणि बाह्यजगासाठी दृष्टीकोन बदलला आहे..... आता मला समजले आहे की कोणतीही परिस्थिती, घटना किंवा इतर व्यक्ती तणाव किंवा चिंता निर्माण करू शकत नाही, पण माझी नकारात्मक वृत्ती, माझ्या नकारात्मक भावना, माझी आंतरिक कमतरता आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची माझी क्षमता नसणे हे माझ्या तणाव, चिंता आणि काळजीसाठी जबाबदार आहेत....

आता राजयोग ध्याना मुळे माझे विचार आणि माझा दृष्टिकोन सकारात्मक झाला आहे.... यामुळे मी नकारात्मक व्यक्तीमध्येही चांगले गुण पाहू शकतो..... आता मी पूर्ण धैर्याने आणि पूर्ण उत्साहाने प्रत्येक परिस्थितीला सहजपणे सामोरे जाऊ शकते आणि परिस्थितीचे सकारात्मक रूपात रूपांतर करू शकते. आता मी प्रत्येक परिस्थितीशी किंवा व्यक्तीशी जुळवून घेण्यास सक्षम आहे. ..... माझ्याकडे आता पुरेसा संयम आणि तग धरण्याची क्षमता आहे, ज्यामुळे मी आता सर्व चिंता, तणाव यापासून मुक्त आहे.

आता माझा देवावरचा विश्वास इतका दृढ झाला आहे की मला असे वाटते की सर्वशक्तिमान परमात्मा शिव नेहमी माझ्या पाठीशी मार्गदर्शकाच्या रूपात आहेत.... तेच माझे सामर्थ्य आहेत... ते माझे रक्षण करत आहेत... आता मी सर्व प्रकारच्या तणाव, चिंता, भीती आणि काळजीपासून मुक्त आहे.... कोणतीही परिस्थिती, घटना किंवा व्यक्ती माझ्या परवानगीशिवाय माझ्यामध्ये तणाव निर्माण करू शकत नाही.


**(अनुवाद : ब्र.कु. शीतल, कॅनडा)**

***

## आरोग्य अमृत

माणूस आरोग्याची हानी करून पैसा कमवतो व पुढे कमावलेले पैसे बिघडलेल्या स्वास्थ्यावर खर्च करतो. ज्या व्यक्तीला जीवन जगताना महिन्याकाठी औषधांचा खर्च करावा लागत नाही, त्याच्यासारखा भाग्यवंत या भूतलावर दुसरा कोणीही नाही.

**संकलक - ब्र.कु. शिल्पा, कोल्हापूर**




# मार सके ना कोई

**बर्नाला, पंजाब येथील पुष्प दीदींची, भ्राता भारत भूषण यांनी घेतलेली चित्तवेधक मुलाखत देत आहोत. १९८०–९० च्या दशकात पंजाब प्रांत दहशतवादाच्या भोवऱ्यात आक्रंदत होता. अशा धामधुमीच्या काळातही चंद्रमणी दादींसोबत अनेक ब्र.कु. ईश्वरी सेवेचे व्रत सोडले नाही. निर्भयतेने हाती घेतलेला वसा, जोमाने पुढे नेला. धर्मो रक्षति रक्षितः या उक्तीप्रमाणे पाऊल उचलले तर साक्षात् शिवपिता आपल्याला कशी मदत करतात त्याचे सुंदर उदाहरण म्हणजे ही मुलाखत आहे. आपणा सर्वांचे मानसिक बळ याद्वारे नक्कीच उंचावेल ही खात्री आहे.**

भारतभूषण : ओम शांती! आज मी आपला परिचय बर्नाला सेवाकेंद्राच्या पुष्पदीदींशी करून देत आहे. ईश्वरी मार्गावर चालताना कितीतरी बाधा येतात. त्या पार करताना निश्चयाची परीक्षाही द्यावी लागते. एकेकाळी पंजाबमध्ये अतिरेक्यांनी भयाक्रांत केलेल्या भागातही ईश्वरी सेवा चालू ठेवणाऱ्या ब्रह्माकुमारी (ब्र.कु.) बहिणी खरंच धन्य आहेत. अतिरेकी गुप्तपणे सेवाकेंद्रावर येऊ लागले आणि पुढे काय घडले ते दीदींकडूनच ऐकूया. दीदी, आम्ही ऐकले आहे, तुम्ही प्रत्यक्ष अतिरेकी मंडळींना सामोरे गेलात आणि धैर्याने तो प्रसंग पार केलात. नक्की काय घडलं ते तुमच्या कडून जाणून घ्यायची उत्सुकता आहे.

दीदी : ओम शांती! गेल्या बेचाळीस वर्षांपासून मी बर्नाल्याच्या सेवाकेंद्रावर राहत आहे. ईश्वरी सेवेत मी रुजू झाले आणि कसा काळ सरत गेला कळले देखील नाही. अतिरेक्यांच्या धामधुमीत सेवाकेंद्रावर आम्हाला पत्र आलं होतं. अमुक दिवशी अमुक वाजता दोन लाख रुपये घेऊन सांगितलेल्या पत्त्यावर या. पोलिसांना कळवाल तर याद राखा, तुमचा आश्रम (सेवाकेंद्र) जाळून टाकू.

प्रश्नः दीदी, पत्र पाठवण्यापूर्वी ते अतिरेकी गुप्त वेषात सेंटरला येऊन गेले होते. खरं ना! त्यांनी ७ दिवसांचा कोर्स ही केला होता, त्यानंतर त्यांनी हे पत्र पाठवले. हे खरे आहे का?

पुष्प दीदी : त्या पत्रानंतर दुसरा एक गट आला होता. हा गट संध्याकाळी ४ वाजता आला होता. ते आले तेव्हा सेवाकेन्द्राचे द्वार बंद होते. दार उघडले तर बहिणीने सांगितले की खूप धिप्पाड असे सरदार आलेले आहेत. तुम्ही त्यांना बाबांचे ज्ञान सांगा. मग मी गेले आणि त्यांचा साप्ताहिक पाठ्यक्रम करायला सुरुवात केली. साप्ताहिक पाठ्यक्रम पूर्ण करून मुरली क्लास ही करायला त्यांनी सुरुवात केली. ते मुरलीला येताच मला आमच्या एका वृद्ध भाईंनी विचारले बहनजी हे लोक कधीपासून येत आहेत? मी म्हटलं तर खूप दिवस झाले येत आहेत. ते भाई म्हणाले, 'अहो, हे तर अतिरेकी आहेत. तुम्ही ह्यांना इथे का येऊ देता? हे ऐकून ही आमच्या कुणाच्या मनात त्यांच्याबद्दल जराही भीती किंवा काही वेगळी भावना निर्माण झाली नाही. मी विचार केला की हे लोक आपल्याला तर काहीच अपाय करत नाहीत मग का घाबरायचे? ते लोक माझ्याबरोबर बसायचे उठायचे कोर्स किंवा क्लास नंतरही. त्यावेळी ते म्हणाले की बहनजी जेव्हा आम्ही कुठे कुठे जातो त्या त्या वेळी तुम्ही आमच्या बरोबर आहात असेच समजतो. आज आम्ही (काही करण्यासाठी) एका घरात गेलो आणि बंदूकीने गोळ्या मारायला लागलो. त्यावेळी तुम्ही आमच्या समोर प्रत्यक्ष झालात. त्यामुळे त्याचवेळी आम्ही हा विचार केला की आजच्यानंतर आम्ही हे वाईट काम कधीच करणार नाही. हा आमचा आजीवन अंतिम निर्णय असेल.

प्रश्नः दीदी जे पहिले पत्र आले तुम्हाला

बोलवण्यासाठी ते सांगा ना जरा!

दीदीः हो! ते पत्र आमच्या सेवाकेंद्रावर आले सकाळीच ब्राह्ममुहूर्तावर आम्ही बहिणी उठलो, योग करायला, जरा बाहेर जाऊन बघितले तर तिथे एक मोठा दगड पडला होता. त्याला एक कागद गुंडाळलेला होता. तो वाचून आम्ही सर्व बहिर्णीनी जरा विचार-विनिमय केला की कुणी हा दगड टाकला असेल बरे!

माझे नाव पूर्वी दर्शना होते. तर ते पत्र वाचले त्यात लिहिले होते की तुम्ही अमुक ठिकाणी २ लाख रुपये घेऊन ताबडतोब या. तुम्ही जर आला नाहीत तर आश्रम रात्री जाळून टाकू हे नक्की आणि ही गोष्ट तुम्ही कुणाला सांगितली तर मात्र त्याचे फार वाईट परिणाम भोगायला लागतील. अशा धमकीवजा पत्रामुळे ही गोष्ट आम्ही फक्त आपासात ठेवली, कुणाला काहीच सांगितले नाही मी म्हटले, ''मी तर जाणार नाही बाई.'' बाकीच्या बहिणी म्हणाल्या, ''मग आता काय करायचं?'' मोठ्या दीदी म्हणाल्या कुणाला सांगावं काहीच कळत नाही असे बोलत आम्ही सेंटर बाहेरच्या बागेत गवतावर बसलो होतो.

एकदम मला काहीतरी जाणवलं आणि मी आत बाबांच्या ध्यान कक्षात गेले. बाबांनी मला प्रेरित केलं की मुली तूच जा आणि अजिबात घाबरू नकोस बाळ मी आहे तुझ्या बरोबर. बाबांचा इशारा मिळताच बाहेर येऊन सर्व बहिर्णीना म्हटलं, ''मी जातेय जे होईल ते होईल.'' दीदी म्हणाल्या, ''नको ग बाई. असे एकटीला तुला मी नाही पाठवणार.'' पण त्या लोकांनी पत्रात एकटीनेच ये असे लिहिले होते. कुणालाही आणायचे नाही. मी दीदींना म्हटले काही हरकत नाही माझ्याबरोबर बाबा आहेत नं! मी कुठे एकटी आहे, मला बाबांनीच तस सांगितलय. कृपा करून मला जाऊ द्या. दीदी म्हणाल्या, ''ठीक आहे. मी बाबांचा प्रसाद बांधून घेतला आणि सायकल वरुन त्यांनी ज्या निर्मनुष्य जागी बोलवलं होतं, तिथे गेले. त्यांनी जसं म्हटलं होतं तर एक तास मी तिथेच बसून राहिले. पण तिथे कुणीच आलं नाही. अशा प्रकारे वाट बघून मी कंटाळले आणि जायला म्हणून उठले, तर तेवढ्यात माझ्या दिशेने ३ मोटर सायकल, त्यावर ३-३ सरदार लोक बसून माझ्यासमोर येऊन थांबले.

त्यांनी जरा दरडावूनच विचारले, 'तू कुठे चालली होतीस? मी सर्व बळ एकत्र करून म्हटलं की मी तुमची खूप वाट बघितली. १ तास उलटून गेला, तुम्ही येण्याची काहीच चिन्ह दिसेनात म्हणून मी परत जात होते. हे ऐकून ते ९ च्या ९ सरदार माझ्या भावती गोल उभे राहिले विचारले की तू ते आणलस का जे आम्ही पत्रात लिहिलं होत? त्यांच ते दरडावणं ऐकून माझ्या हृदयाचे ठोके वाढले. घाम फुटायला लागला आणि आवाज ही कंप पावू लागला. मी डोळे मिटले त्या थरथरत्या अवस्थेत अचानक मला बाबांची आठवण आली. बाबा म्हणत होते, 'मुली आत्मिक स्थितीत स्थित हो. त्यांनाही आत्मिक रुपात बघ!' मी तात्काळ माझी स्मृती बदलली, आपल्या आत्मिक स्मृतीत मी स्थित झाले. ते सरदार म्हणाले २ लाख रुपये दे आत्ताच्या आत्ता.

मी म्हटलं, 'माझ्याकडे पैसे नाहीत. ते म्हणाले, 'ह्याचा अर्थ तू पैसे आणले नाहीस तर!

मी - खरंच पैसे नाहीत आमच्याकडे कुठून आणू?

तुम्ही लोकांनी आश्रमाची एवढी मोठी इमारत बांधली ती कशी बांधली? कुठून आणले एवढे पैसे?

मी - सर्व भावा-बहिर्णीनी आपल्याकडील पै अन् पै साठवून हा आश्रम बांधला आहे. आमच्याकडे आता तुम्हाला द्यायला पैसे खरंच नाहीत.

सरदार - पैसे नाहीत, तर आता सरळ उभी राहा तुला कुणाला भेटायचं का?

मी - नाही कुणालाच भेटायचं नाही मला. हाच प्रश्न त्यांनी मला दोनदा विचारलं, पण मी ही माझ्या उत्तरावर ठाम होते. त्यांनी परत तिसऱ्यांदा विचारल कुणाला भेटायचंय? त्याच वेळी मला बाबांनी जसे काही प्रेरित केले असे वाटले मी बाबांच्या कुशीत आहे आणि सुरक्षित आहे.

मी सरदारांना म्हटलं मला फक्त ५ मिनिटे द्या मी खाली बसून ५ मिनिटं बाबांची शक्तीशाली आठवण केली. स्वतःला परत बाबांच्या कुशीत सुरक्षित असल्याची जाणीव करून दिली.

सरदार लोक गोलाकार बंदुक घेऊन माझ्या भोवताली उभे होते ५ मिनिटे म्हणून जी मी बसले १५-२० मिनिटे झाले. तरी मी उठत नाही बघून एका सरदाराने मला हलवले. म्हणाला - ताई तुमची वेळ संपली आता ५ मिनिटे दिली होती तुम्हाला २० मिनिट उलटून गेली.

मी - तू मला असा स्पर्श करू शकत नाहीस. तुला जे काही म्हणायचं ते तोंडाने बोलून सांग.

सरदार - सरळ उभी राहा. मग मी उभी राहिले. त्या नऊ जणांनी बंदुकीवर हात

(पृष्ठ क्र.२८ वर)

# "शिवबाबा माझा पाठीराखा"

(भाग ६)

## दूध व्यवसायाला भरभराट आली बाबांमुळे

ब्र.कु. बापू, कोल्हापूर

**शेतकरी कुटुंबात जन्मलेले कोल्हापूर जिल्ह्यातील कांडगावचे रहिवासी ६५ वर्षीय बापूभाई आजन्म ब्रह्मचारी ब्रह्माकुमार आहेत. त्यांना आजवर आलेले ईश्वरी अनुभव थक्क करणारे आहेत. आपणा सर्वांसाठी क्रमशः प्रसिद्ध करत आहोत...**

मी ज्ञानात आलो त्यावेळी मला नोकरी नव्हती. मी नुकताच आय.टी.आय. पास झालो होतो. १९८३ ची गोष्ट आहे. ब्रह्माकुमारी कोल्हापूर सेंटरच्या प्रमुख आदरणीय राजयोगिनी सुनंदा दीदींनी त्यावेळी मला मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, बापूभाई तुमच्याकडे म्हैशी आहेत, तर तुम्ही दुधाचा व्यवसाय का करत नाही? मी मग मानसिक तयारी केली. अमृतवेलेला बाबांच्याकडून अनुमती घेतली. आमच्या गावापासून कोल्हापूर १४ कि.मी. अंतर! पण सायकलला दुधाचे कॅन आणि घागरी अडकवून दररोज कोल्हापूरला दूध घालू लागलो. बाबाकडून मला धैर्य आणि शक्ती मिळत होती. उमंग आणि उत्साह होता. मी बाबाचा हात घट्ट पकडला होता. त्यामुळे दुधाच्या व्यवसायात माझी प्रगती होत गेली. सुरुवातीला मी लक्ष्मी स्कूटर घेतली. नंतर माझ्याकडे एन ८० आली. सायकल चालविण्याच्या श्रमातून बाबाने माझी सुटका केली.

अशातच मी एकदा मधुबनला गेलो. त्यावेळी परम आदरणीय दादी प्रकाशमणी यांच्या भेटीचा योग आला. माझ्याबरोबर कोल्हापूरचे आणखी चार भाई होते. गप्पांच्या ओघात दादींनी मला विचारले, आप क्या काम करते हो? मी म्हणालो, दूध बेचता हूँ। हे ऐकून दादींनी रमणिकतेने मला विचारले, 'क्या दूध में पानी भी डालते हों?' मी थोडा गडबडून गेलो. पण दादी माझी थट्टा करत आहेत हे मी ओळखले. मीही गमतीत म्हणालो, हाँ, दादी थोडा पानी डालना पडता है। त्यावर त्या म्हणाल्या, पर मर्यादा का पालन करो!

अशा प्रकारे माझा दुधाचा व्यवसाय चालू होता. तरीही म्हणावी तशी प्रगती होत नव्हती. माझ्या मनात स्वतःची दूध डेअरी सुरू करण्याचा विचार घोळत होता. एके दिवशी मी असाच बाबांच्या ध्यानकक्षात बाबांशी बातचीत करत होतो. बाबा मी आता काय करावे? बाबांनी मला प्रेरित केले... आपल्या गावाशेजारील वाशी या गावी अंबाई दूध डेअरी सुरू होणार आहे. तेथे आपण दूध घालू शकतो... एक प्रकारे बाबांनी मला दिशा दाखविली. मी तेथे दूध घालायचे ठरविले. पण आमच्या दुधाची प्रत कमी भरू लागली. तेथील साहेबांनी मला एक सल्ला दिला, तू कोल्हापूरला जसे दूध घालत होतास तसे डेअरीला घालत जा आणि चांगल्या फॅटचे दूध तू दूध संघाला घालत जा. त्याच्या मुखातून जणू बाबाच बोलत होता. मला माझ्या व्यवसायात यश दिसू लागले.

पुढे मी दहा हजार रुपये घालून फॅट मशीन आणले आणि ४ सप्टेंबर २००४ रोजी आमच्या गावात स्वतःची 'हिराई दूध संस्था' सुरू केली. माझे स्वप्न पूर्ण झाले. बाबाने माझे स्वप्न पुरे केले. आज माझ्याकडे तीन कामगार आहेत. रोजचे ३०० लिटर दूध संकलित होते. भागात माझी डेअरी दुसऱ्या क्रमांकावर आहे. मीही बाबांच्या आठवणीत ईश्वरी सेवा समजून माझा व्यवसाय करत आहे. शुक्रिया बाबा! शुक्रिया!

**शब्दांकन : ब्र.कु.प्रा. दिनेश डांगे, कोल्हापूर**

***

# परीकथा

## (भाग १४)

# सृष्टीचक्र


ब्र.कु. रेखा, देगलूर



सृष्टीचक्र वा सृष्टी नाटकाचा निर्माता व दिग्दर्शक कोण आहे? मागील बऱ्याच भागात मी (शामा) तुम्हाला आपल्या सर्वांची लाडकी राधा हिची स्वप्नातली गोष्ट सांगत होते. राधा मात्र स्वप्नातल्या परीची गोष्ट ती सर्वांना सांगायची व स्वतः त्यावर विचार करून तिच्या बाबांना व मला त्याविषयीचे अनेक प्रश्न विचारायची. परी नवी गोष्ट कोणती सांगणार याविषयीची तिची उत्सुकता आजही कायम आहे. ती ऐकून स्वतःमध्ये खूपच बदल करत आहे. एके दिवशी आमच्याकडे संक्रांतीनिमित्त हळदी कुंकवाचा कार्यक्रम होता. मी रांगोळ्या काढत होते. मदतीला राधा व नंदिनी दोघी आल्या होत्या. एवढ्यात रांगोळी हातात घेऊन राधा मला म्हणाली, “अगं आई मला स्वस्तिक काढायला शिकवतेस का?” नंदिनी म्हणाली, “काकू मला पण शिकवा ना हो? राधा म्हणाली, “आई स्वस्तिकात चार समान भाग असतात ना गं!” नंदिनी म्हणाली “असंच ना काकू?” काय छान रांगोळी काढलीय तुम्ही दोघींनी असे आमचे संवाद चालले होते. एवढ्यात शेजारच्या काकू हळदी कुंकवासाठी आल्या. काकू म्हणाल्या, “काय चर्चा चालू आहे सर्वांची, आम्हालाही सांगा” मी म्हणाले, “काही नाही, पण ह्या मुलींना मी स्वस्तिक काढायला शिकवत आहे.” एवढ्यात राधा म्हणाली, “काकू या स्वस्तिकाचे एक रहस्य तुम्हाला सांगू का?” काकू म्हणाली, “काय आहे गं रहस्य?” राधा म्हणाली, “काकू यावेळेस की नाही परीने मला स्वस्तिक वर एक खूप छान गोष्ट सांगितली” काकू म्हणाल्या, “राधा परीने तर तुला खूप छान छान गोष्टी आजवर सांगितल्या आहेत. आताही सांग काय ते.” राधा गोष्ट सांगू लागली, “काकू माझ्या स्वप्नात तीन-चार दिवस झाले की परी येते बघा. मला खूप खाऊ पण आणते” एवढ्यात नंदिनी म्हणाली, “राधा या वेळेस काय दिले गं परीने” राधा म्हणाली, “खूप गोड अशी द्राक्षे आणली होती. आज परीने खूप उंच पहाडावर नेले. तिथे पुष्कळ फुलांनी स्वस्तिकाचे चिन्ह काढलेलं होतं” रांगोळीकडे बोट दाखवत परी म्हणाली, “बाळा या रांगोळीला काय म्हणतात माहीत आहे का?” मी विचार करून म्हणाले, “अगं याला स्वास्तिक म्हणतात बरोबर ना?” परी म्हणाली, “हो! या स्वस्तिकातले चार भाग समान आहेत व दुसरी गोष्ट चारी भाग वेगवेगळ्या दिशेला आहेत. याचा अर्थ असा आहे की चार भाग म्हणजेच सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग, कलियुग. हे कालचक्र आहे म्हणजे एक प्रकारे मोठे घड्याळच म्हणा. या जगरहाटीचा कालावधीच दाखवते ही आकृती. याच्या चारही भागांचा कालावधी १२५० वर्षाचा आहे. सगळ्यात वरचा भाग उजवीकडची बाजू आपण शुभ मानतो जशी पूजा करते वेळी उजव्या हाताचा वापर करतेस.” राधा म्हणाली, “हो पण तुला कसं माहीत?” परी स्मित हास्य करून म्हणाली, “बाळा बहुतेक सर्वजण उजवा हात शुभ मानतात म्हणूनच उजव्या हाताने शुभ कार्य करतात. सत्ययुग, त्रेतायुग या दोन युगांमध्ये आपण सुख शांती संपन्न राज्य उपभोगतो. या युगात सूर्यवंशी चंद्रवंशी मनुष्य राज्य करत होते. याकाळात सृष्टीसुद्धा सत्त्वप्रधान म्हणजेच पवित्र होती. सर्व मानव पवित्र जीवन जगत होते, मनुष्यात्मा दैवी गुणसंपन्न होता म्हणून त्याला देवी-देवता असे संबोधले जाते. एकमेकांशी सुख शांती प्रेमाने सगळे राहत होते.” मी परीला विचारले, “सूर्यवंशी, चंद्रवंशी म्हणजे काय?” परी म्हणाली, “सूर्यासारखं तेजस्वी पवित्र, शुद्ध, प्रेमळ सर्व गुण संपन्न असं राज्य असतं. तिथे धन-धान्य संपन्न असे सोन्याचांदीचे महाल होते. म्हणून त्याला सूर्यवंशी म्हटलं गेलं. त्याचप्रमाणे कालचक्र पुढे गेले.

जसे घड्याळाचे काटे १२ पासून पुढे सरकतात, एक–दोन वाजतात त्याप्रमाणे. म्हणजे त्रेतायुगात चंद्रासारखी शीतलता होती. चांदीचं युग ज्याला सिल्वर युग असे म्हणतात.'' परीने स्वस्तिकाच्या तिसऱ्या भागाकडे बोट दाखवून म्हटलं, ''राधा बाळ हा तिसरा भाग म्हणजे द्वापरयुग. या युगात इतर अनेक धर्मांचे संस्थापक येऊन आपापले धर्म स्थापन करू लागले. जसे हजरत इब्राहिमद्वारा इस्लामची स्थापना. गौतम बुद्धाद्वारे बौद्ध धर्माची स्थापना. येशू ख्रिस्ताद्वारे ख्रिश्चन धर्माची स्थापना. आणि हो! संन्यास धर्माचे संस्थापक आद्य शंकराचार्य, हजरत मुहम्मद पैगंबरांद्वारे मुसलमान धर्माची स्थापना करून गेले. पुढे शीख पंथाची स्थापना गुरु नानकांद्वारे झाली. असे वेगवेगळे धर्म द्वापारयुगापासून विकसित होत गेले.'' मी विचारले, ''परी पूर्वी एक धर्म होता नंतर मात्र अनेक धर्म झाले, हो ना!'' परी म्हणाली, ''बरोबर आहे बाळा. वेगवेगळ्या धर्मांमुळे वेगवेगळी मत मतांतर, आपापसात मतभेद भांडण, लढाया, दुःख, अशांती वाढत गेली. आणि याहीपेक्षा या चौथ्या युगात मात्र धर्माची अति ग्लानी झाली. अनेक भाषा, अनेक प्रांत, जमिनीचे हिस्से, पाण्यावरून वाद, इतकेच काय; पण आकाशाच्या कक्षेतही हिस्से निर्माण झाले. कलियुगात अज्ञान अंधकार वाढत गेला. काळाच्या गतीनुसार भक्तीही वाढली; पण माणसाने आपले सत्त्व दिवसेंदिवस घालवले. धर्म क्षीण होत गेले. आपला जो पूर्वी आदि सनातन देवी देवता धर्म होता तो देखील क्षीण झाला. सर्व पतित बनले त्यालाच धर्माची अति ग्लानी म्हटले आहे. अशा वेळेस सर्व आत्म्यांचा पिता अर्थात परमपिता शिव परमात्मा या सृष्टीवर अवतरित झाले. शिव निराकार आहेत, अर्थात त्यांना स्वतःचा देह नाही त्यामुळे या भौतिक सृष्टीतील मानवी देहाचा आधार घेऊन ते आपला सत्य परिचय देतात. आपण कोण आणि शिव स्वतः कोण आहेत याचा सत्य परिचय. ज्या मानवी देहाचा आधार घेतात त्यांचे कर्तव्यवाचक नाव 'प्रजापिता ब्रह्मा' ठेवतात. शास्त्र–पुराणात वर्णन आढळते–ब्रह्म देवाने सृष्टी रचली, ब्राह्मणांची निर्मिती केली. यामागे आध्यात्मिक अर्थ आहे. मुखाद्वारे ज्ञान देऊन जणू नवजन्म देतात, ज्ञानद्वारे जीवनात आमूलाग्र बदल घडवितात म्हणून त्यांना द्विज म्हणतात. या काळास पुरुषोत्तम संगमयुग असेही म्हणतात. त्यानंतर पुन्हा नवसृष्टीची स्थापना होते. परमपिता परमात्मा आपल्या दिव्य ज्ञानाद्वारे मनुष्यात्म्यांचे जीवन परिवर्तित करतात. त्यातूनच सृष्टीपरिवर्तनची प्रक्रिया घडते. पुन्हा सत्ययुगाचा आरंभ होतो. कालचक्र नव्याने सुरू होते.'' एवढं बोलून मात्र परी थांबली. मी परीला विचार करत म्हटले, ''परी या स्वास्तिका मध्ये तर खूप मोठं रहस्य आहे. परी मला खूप खूप आवडलं मी हे गुप्त रहस्य सर्वांना सांगेन. पण मला एवढं सगळं कसं लक्षात राहील.'' परी हसत म्हणाली, ''बाळा तुला जेवढं लक्षात राहील तेवढं तू सांग आणि शिव परमात्मा तुला खूप शक्ती देतील. तू रोज आठवण केलीस, तर तुला हे सर्व लक्षात राहील'' असे म्हणत परी माझ्या डोक्यावरून हात फिरवत विमानात बसली व आकाश मार्गाने उडत निघून गेली. राधा थोडी हिरमुसली होऊन सांगत होती. मग म्हणाली, ''काकू मला त्या विमानात बसून वर जायचं होतं. पण ती लगेच दिसेनाशी झाली.'' काकू म्हणाल्या, ''बाळा तुझी परी तर दोन–तीन दिवस झाले की अजून परत येईल मग तू पुन्हा तिला सांग की मला तुझ्या विमानात बसायचे आहे. आणि तुझी परी तुला विमानात बसवील बाळा. परीने तुला खूप छान गोष्ट सांगितली. त्या स्वास्तिकामध्ये असलेले रहस्य तू मला खूप छान पद्धतीने सांगितलेस. बाळा मी तर शास्त्रात असं ऐकलं होतं. स्वास्तिक एक मंगलकारी चिन्ह मानतात आणि शुभ कार्याचे प्रतीक/चिन्ह आहे. या स्वास्तिकलाच गणेशाचे रूप सुद्धा म्हणतात. परंतु बाळा ही गुप्त गोष्ट मला माहीत नव्हती. या स्वास्तिकाचं खूप छान रहस्य तुझ्या परीने सांगितले तुझ्या परीला धन्यवाद आणि तुला सुद्धा.'' मी त्या दोघांच्या जवळ जात म्हणाले यावर काकू म्हणाल्या, ''ताई मला आज स्वास्तिकाचे मूळ गुप्त रहस्य समजले खूप छान!'' एवढं बोलून काकू नंदिनीकडे पाहत म्हणाली, ''बाळा आपण जाऊया का खूप उशीर झाला आहे राधा बाळ मी परत येईन तुझी पुढची गोष्ट ऐकायला.'' असं म्हणत काकू व नंदिनी परत निघाल्या. मी मात्र बाबांच्या आठवणीत पुटपुटत राहिले 'ज्ञानप्रकाश दाविला सद्गुरूने । तमाचे रिंगण भेदिलें सद्गुरूने ।।' मी बाबांना खूप खूप धन्यवाद दिले.

***



# एक तरी दोहा अनुभवावा

'मना'च्या विषयी कबीरांचे दोहे:

**कबीर यह मन लालची, समशैं नहीं गंवार।**
**भजन करन को आलसी, खाने को तैयार।।१।।**

कबीर म्हणतात, हे मन फार लोभी आहे. ते इतके मूर्ख आणि अडाणी आहे की त्याला सत्य समजत नाही. ध्यान आणि भजन करताना ते कमालीचे आळशी असते. खाण्या-पिण्याच्या बाबतीत मात्र ते सदैव तयार असते.

**कब मन तो एक है, भावै तहां लगाय।**
**भावै गुरु की भक्ति कर, भावे विषय कमाय।।२।।**

कबीर म्हणतात, मन तर फक्त एक आहे. याला जिथे चांगले वाटते तिथे लावा. याच्याकडून हवी तर गुरूची सेवा आणि भक्ती करवून घ्या नाही तर या सांसारिक विषय भोगांचा तात्कालिक रस मिळवा.

**मन के मारे बन गये, बन तजि बस्ती मांहि।**
**कहे कबीर क्या कीजिये, यह मन ठहरे नांहि।।३।।**

मनामुळे पराभूत आणि त्रस्त होऊन जंगलात आणि वनात गेलो तरी तेथेही तीच स्थिती होते. म्हणून जंगल सोडून पुन्हा आपल्या गावात वस्तीत आलो. कबीर म्हणतात, आम्ही आता काय करावे? हे मन फारच प्रबळ आहे. ते कुठेही स्थिर होत नाही.

**अनुवाद : ब्र.कु. प्रा. दिनेश डांगे, कोल्हापूर**

***

---

# जरा हसूया



१. मुंबईमध्ये दूध कोण देतो? तर मुंबईमध्ये भैया दूध देतो.
एकदा एका मराठी गृहिणीच्या घरातले दूध नासले.
तेव्हा त्या बहेनजी भैयाला म्हणाल्या, ''भैय्या आज दूध क्यों नासा?''
त्यावर तो भैय्या म्हणाला, ''बहेनजी आज दूध इसलिए नासा क्यूंकि आपने भांडा नहीं घासा!''

२. एक मनुष्य हातात सायकल घेऊन पळत सुटला होता. वाटेत त्याचा मित्र भेटला.
त्याने विचारले, ''काय हो हे काय करताय?''
त्यावर तो म्हणाला, ''काय सांगू राव! मी इतक्या घाईत आहे की,
मला सायकलवर बसायलासुद्धा वेळ नाही!''

प्रेषक : **ब्र.कु. ज्ञानदेव पाटील,**
पाडली खुर्द, जि. कोल्हापूर




# आरोग्य रहस्य

**वैद्य सुविनय दामले, कुडाळ**

**साधनेत 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' या न्यायानुसार शरीरस्वास्थ्य ठीक राहणे अति आवश्यक आहे. त्याकरिता काही वेचक आणि वेधक टीपा या लेखमालेद्वारे देत आहोत. वाचकांना लाभ होत राहो हीच कामना.**

**अ. सुखकारक मलप्रवृत्ती**

सकाळी अंथरुणातून बाहेर पडल्यावर पाच मिनिटामध्ये मलप्रवृत्ती करण्यासाठी जावे, आणि साफ मलप्रवृत्ती होऊन पाच मिनिटात बाहेर पडले तर समजावे आजचा दिवस छान जाणार आहे. नाहीतर रात्रीचे जेवण आपणाला नीट पचले नाही असे समजावे. ते आधी पचवावे. तोपर्यंत दुसरा पदार्थ पोटात टाकू नये. ते अन्न पचवण्यासाठी अर्धा इंच आल्याचा तुकडा सैंधवाबरोबर चावून खावा.

**आ. मलमूत्र विसर्जन कुठे केव्हा ?**

हे नियम पाळणे आज अशक्यप्राय वाटतील. पण ज्या काळात हे ग्रंथ लिहिले, संस्कारित केले, त्या काळाचा विचार करता, किती सूक्ष्मविचार आचार्यांनी केला होता, त्याची आरोग्याकडे पाहायची दृष्टी कशी होती हे अभ्यासता यावे, म्हणून हा सर्व खटाटोप!

सूर्योदय झाल्यानंतर जर मल विसर्जन करायचे असेल तर उत्तर दिशेला तोंड करून आणि काळोख असेल तर दक्षिणेला तोंड करून मलमूत्र विसर्जन करावे. आलेला मलमूत्र वेग काहीही झाले तरी तो टाळू नये किंवा जोर लावून कुंथून वेग निर्माण करू नये.

हे साधे नियम जरी पाळले तरी मूळव्याध आदि रोग होत नाहीत.

सुखकर मलप्रवृत्ती होण्यासाठी गरज वाटली तर प्रकृतीनुसार, वैद्यांच्या सल्ल्याने फक्त आठ घोट कोमट पाणी प्यावे. तांब्याभर पाणी पिणे सर्वथा चूक आहे.

मलप्रवृत्ती साफ होण्यासाठी घेतलेले पाणी मलमार्गाने बाहेर पडतच नाही. ते मूत्रमार्गावाटे बाहेर काढावे लागते. म्हणजे मूत्रवहन संस्थेला विनाकरण पाणी गाळण्याचे काम, अधिक श्रम घेऊन करावे लागते.

सुखकर मलप्रवृत्तीसाठी तेल अथवा तूप वापरले तर ते मात्र मलमार्गाने बाहेर निघून जाईल, म्हणजे जिथे वंगण पोचले पाहिजे तिथे ते मिळत जाईल. (याकरिता हे तेल, तूप, जेवणातून मिळेल, अशी व्यवस्था असावी. म्हणजे हे तेल कच्च्या स्वरूपात जेवतानाच घ्यावे.) (तेल, तूप कच्चे खाण्याने आजच्या भाषेतील 'कोलेस्टेरॉल'ची भीती राहत नाही.)

ज्या दिशेत सूर्य, चंद्र, वारा आहेत त्या दिशेला तोंड करून मल मूल विसर्जन करू नये. ज्या बाजूला भोजन कक्ष, अग्नी किंवा पाण्याचे साठे असतील त्या दिशेला तोंड करू नये.

मलमूत्र विसर्जन करताना जमीन समतल नसावी. जमिनीचा उतार असेल त्या दिशेला तोंड करावे. पण मूत्र विसर्जनाकरिता पुढील बाजूस, मल विसर्जनाकरीता मागील बाजूला उतार असावा, जेणेकरून अपवित्र मलमूत्रांचा स्पर्श पायांनादेखील होणार नाही. किमान वास्तुशास्त्राचा आधार आणि कमाल व्यवहारज्ञान वापरून भारतीय बनावटीच्या स्वच्छतागृहाचा वापर जिथे आणि ज्यांना शक्य आहे त्यांनी करावा ही अपेक्षा!

या नियमांचा वापर करण्यामागचा भारतीय आचार्यांचा दृष्टिकोन लक्षात घेतला, की आज पाश्चात्त्य कमोडमधील दोष सरळ सरळ दृष्टीस पडतात आणि ते दाखवावेसे वाटतात.

समोर चूक घडत असताना ती चूक न दाखवता गप्प बसता येत नाही, मग काहीजणांचा रोष ओढवून घ्यावा लागतो. असो. आपण सांगण्याचे काम करावे.

***




# प्रश्नोत्तरे

(भाग ७)

ब्र.कु. सूरज, आबू रोड

प्रश्न : भाईजी ब्रह्माकुमारी संस्था संपूर्णपणे महिलांद्वारे नारीशक्तीद्वारे संचालित आहे हे सर्वश्रुत आहे, तरीही आज तुम्ही या संस्थेत अशी एक जागा, अशी एक ओळख निर्माण केली आहे, ते पाहून आम्ही लोक असेही म्हणू शकतो की भावांमध्ये (पुरुषांमध्ये) बघायचे झाल्यास आम्हाला सूरजभाईंसारखे बनायला आवडेल कारण तुम्ही खूप लोकांचे आदर्श झाला आहात, याबद्दल काय सांगू इच्छिता आपण?

उत्तर : मी पण बाबांशी अक्षरशः भांडायचो ज्ञानात नवीन असताना की तुम्ही मला स्त्री का नाही बनवलं? कारण संस्थेचा सर्व कारभार बहिणीच सांभाळतात. त्यामुळे त्यांना वेगवेगळी पदं, सेवा सांभाळण्याच्या अनेक संधी होत्या. (हा झाला गमतीचा भाग) पण मला आधीपासूनच माहीत होते की माझ्यावर शिवबाबांची पवित्र दृष्टी नक्की आहे आणि ते मला खूप मोठं करू इच्छितात, मलाही श्रेष्ठ बनायचं आहे. त्यामुळे बाबा आणि माझ्या एकाच प्रकारच्या भव्य दिव्य संकल्पांचे एकीकरण झाले. बाबांनी श्रीमत दिले, त्याचे मी वेळोवेळी तंतोतंत पालन केले. त्याचबरोबर बाबांकडून मला खूप आशीर्वादही प्राप्त झाले. तुम्हाला सांगतो माझी बाबांशी खाजगीत भेट (एकाट्याने भेटणे) खूप वेळा म्हणजे कमीत कमी ५० वेळा तरी झाली असेल आणि त्या काळात मला हे माहीत नव्हते की बाबांचे महावाक्य माझ्यासाठी वरदान बनत आहेत, पण नंतरच्या काळात आणि आताही माझ्यासाठी तेच सुंदर महावाक्य वरदान बनून कार्यरत आहेत. आज मी जो काही आहे, तो ह्याच वरदानांचा प्रभाव आहे. परमेश्वरांकडून प्राप्त भेट वस्तू म्हणता येईल. मी थोडं केलं त्यांनी भरभरून दिलं – म्हणतात न आंधळा मागतो एक डोळा..... असंच काहीसं माझ्या बाबतीत झालं.

प्रश्न : भाईजी तुमच्याशी बोलून आम्हाला कळले की बाबा तुम्हालाही खाजगीत भेटले, बोलले अशी कोणती खास गोष्ट असते किंवा तुम्हाला कोणती दिव्यानुभूती होते, जेव्हा ईश्वर साक्षात तुमच्या समोर, तुमच्याशी बोलत असतो?

उत्तर : असं पाहा बाबांना तर मी अनेक वेळा म्हणजे ५० पेक्षा जी जास्त वेळा स्टेजवर भेटलो हे मी सांगितलेलेच आहे. तसेच मी जेव्हा मनापासून आळवले तेव्हाही बाबा कितीतरी वेळा आलेत. माझी बाबांशी खूप जवळीक (घनिष्ठता) आहे, ते मला खूप आपले वाटतात. त्याचबरोबर परमेश्वर माझा सखा आहे ह्या नात्याने खूप आठवण करतो. त्यामुळे माझी त्याच्यावर खूप अधिकाराची भावनाही आहे आणि म्हणूनच बाबा माझी प्रत्येक गोष्ट ऐकतात असेही मला वाटते. हे खूप चांगले आहे की लोकं मी सांगितलेलं परमात्म्याचंच (सोप्या शब्दातील ज्ञान) ज्ञान ऐकतात. त्यातही बाबांची मला फार मदत होते. तसेच मला कोणतीही अडचण जाणवली, शारीरिक आजारपण आले, तर मी सर्वात आधी माझ्या ह्या मित्राला (खुदा दोस्त) बोलवतो आणि तो मला लगेच बरंही करतो. प्रत्येक अडचण चटकन दूर करतो. हा सर्व अनुभव परमेश्वराकडून घेणं म्हणजेच अतीन्द्रिय सुखाची (इंद्रिया पलीकडील सुख) अनुभूती करणे होय. सुख आणि आनंद तर माणसाला इथे, या जगात तर मिळतेच. पण ह्या सर्वांच्या पलीकडला तो Super sensious joy ज्याला परमानंद म्हणतात त्याची अनुभूती घेताना आपले मन पूर्णपणे शांत होवून जाते आणि ईश्वर प्रेमात हरवून जाते.

जेव्हा ह्या महान गोष्टी परमात्म अनुभूतीची सुरुवात झाली तेव्हा मी ४-४ (पहाटेच्या) वाजेपर्यंत आत्मानंदात-परमानंदात हरवून

जायचो. याला शास्त्रात लोकांनी 'निर्विकल्प समाधी अवस्था' म्हटले आहे. कितीतरी वेळा ह्या स्थितीत मी अनेक तासही व्यतीत केलेले आहेत.

त्यावेळी मला स्वतःच आस्तित्व बिलकुल जाणवायच नाही. एकदम अशरीरी अवस्था (देहातून मुक्त) आत्मानुभूतीत परमेश्वरी (निराकार शिवबाबांच्या) किरणांखाली – त्याच्या शक्ती, किरण माझ्यावर पडून माझ्यात सामावत आहेत. असं वाटायचं. हा माझा त्यावेळचा अनुभव असे.

***

---

(पृष्ठ क्र.२१ वरून)

ठेवला आणि चाप ओढणार तेवढ्यात त्या सर्वांना माझ्या बरोबर बाबा दिसायला लागले. त्यांनी मला विचारलं की ही वृद्ध व्यक्ती कोण आहे **तुझ्या बरोबर.**

मी – मी तर एकटीच आलेय तशी तुमची ताकीद होती. मी सायकलवर एकटीच आले.

सरदार – मग आम्हाला हे कोण दिसतंय? हे ऐकताच माझ्यातही एक शक्ती संचारली वाटलं खरंच बाबा सोबत आहेत.

एक सरदार बंदूक चालवायला लागला, तर त्याला बाबा दिसले. मग दुसरा म्हणाला मी करतो. तर त्यालाही ब्रह्माबाबा दिसायला लागले. असेच सर्वांना बाबा दिसले. त्यामुळे ते ९ ही जण माझ्या पाया पडले. एकासुरात म्हणाले, 'की ताई, तुम्ही आमची बहिण आहात आणि आम्ही तुमचे भाऊ तुम्हाला कधीही, कोणत्याही गोष्टीची आवश्यकता जाणवली तर तात्काळ आम्हाला फोन करा. मी म्हटलं – ठीक आहे भावांनो!

मग मी त्यांना बाबांचा प्रसाद देऊ लागले. पण त्याचे ४-५ तुकडे होते आणि ते ९ लोक. ते म्हणाले, 'ताई, किती कमी प्रसाद आणलात तुम्ही!' माझ्यात शक्ती संचारली मी म्हटलं भावांनो मला काय माहित तुमची एवढी मोठी टोली येईल मला भेटायला. मला वाटलं होतं ४-५ जण असतील. त्यानंतर मी सर्वांना १/२-१/२ तुकडा दिला. सर्वांनी मला वाकून नमस्कार केला आणि मला सेवा केंद्रापर्यंत सोडायलाही आले.

भारत भूषणभाई – तुम्हाला बाबांनी किती शक्तिशाली जबरदस्त अनुभव करविला. त्या सरदारांना अशी कुणी बहिण एकटं जाण्याची हिम्मत करू शकत नाही. अशा लोकांना तरी बाबांच्या मदतीने दीदी तिथपर्यंत पोचल्या. एवढे भयंकर मारेकरी भोवताली बंदूक घेऊन उभे असतानाही निर्भय होऊन दीदी आत्मिक स्थितीत योगात बसल्या आणि बाबांनी त्यांना साक्षात्कार घडवून दीदींना वाचवलेच पण त्या भयंकर मारेकऱ्यांची ही बुद्धी बुद्धिवानाची बुद्धी बाबांनी पालटवली आणि ते बाबांचे सहयोगी ही बनले. ही आहे. प्रिय बाबांची कमाल ! त्यानंतर ते परत कधी आले का सेवा केन्द्रावर?

दीदी– हो! ते सेवाकेन्द्रावर आले होते त्यानंतर नेहमी येत राहिले, ज्ञानही घेतले. कोर्स करून १ महिनाभर ते मुरली क्लासलाही आले. जेव्हा जेव्हा रस्त्यात भेटायचे तेव्हा ते ओम् शांती जरूर म्हणायचे.

तर ही बाबांची खरंच कमाल आहे की, जेव्हा हा दहशतवाद पंजाबात आपली पाळंमुळं रोवून उभा होता. हा तर एका ठिकाणाचा अनुभव आहे, पण संपूर्ण पंजाबमध्ये बाबांच्या खूप ठिकाणावरचे सेवाकेंद्रावर असेच अनुभव आहेत. अंतकाळात बाबांना आपल्या अनन्य मुलांना मदत मिळणार हे नक्की. बाबा स्वतः बनून मुलांचे रक्षण करतील.

'जाको राखे साई मार सके ना कोई' हेच खरे आहे.

***

## यक्ष प्रश्न

प्रश्न - मोह म्हणजे काय? मान (मानापमानातील मान ) काय आहे? आळस काय आहे? शोक काय आहे?

उत्तर - धर्ममूढता म्हणजेच मोह आहे. स्वतःला शहाणा समजणे (आणि त्याचबरोबर इतरांना कमी लेखणे) हा वृथा मान आहे. धर्मपालन न करणे हा आळस आहे. अज्ञान हाच शोक आहे म्हणजे अज्ञानामुळे शोककारक परिस्थिती निर्माण होते.




शिवाजी नगर, ठाणे : जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमात समाजसेविका विशाखा खटाल यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. सरला



टेंभूर्णी : आमदार संतोष दानवे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना ब्र.कु. सुनंदा व ब्र.कु. मीरा



देऊळगाव राजा : स्थानिक होम मिनिस्टर कार्यक्रममध्ये ब्र.कु. सुनंदा यांचा सत्कार करताना डॉ. उषा खाडेकर



वाशी : महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात ईश्वरी भेटवस्तू दिल्यावर ग्रुप फोटोत पोलीस निरीक्षक भ्राता मधुकर भटे, डॉ. आरती ओबेरॉय, ब्र.कु. शीला, ब्र.कु. शुभांगी व अन्य



चिखली, बुलढाणा : महाशिवरात्री निमित्त कार्यक्रमात प्राचार्य डॉ. कैलाश बियानी, माजी आमदार भ्राता राहुल बोंद्रे व इतर मान्यवरांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. सुरेखा व ब्र.कु. निर्मला



जकातवाडी, सातारा : जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष भ्राता अमोल मोहिते यांना ईश्वरी संदेश देताना ब्र.कु. शांता व सहा. अधीक्षक अभियंता धनंजय माने

Registration No. : MAHMAR/2007/21914



शांतीवन, आबू रोड : राजयोगिनी ब्र.कु. रतनमोहिनी दादी यांच्या १०० व्या वाढदिवसानिमित्त मानपत्र देताना महाबोधी इंटरनॅशनल मेडीटेशनचे अध्यक्ष भ्राता भिक्खू संघसेना



चंद्रपूर : पारंपरिक लोककला उत्सवात दीप प्रज्वलन करताना राजयोगिनी ब्र.कु. आशा दीदी, ब्र.कु. चंद्रिका दीदी, ब्र.कु. प्रेम, ब्र.कु. सतीश, ब्र.कु. कुंदा व अन्य



तळेगाव दाभाडे : विश्व एकता आध्यात्मिक अभियाननिमित्त कार्यक्रमात उद्योजक यादवेंद्र खळदे, उद्धव चितळे, नगराध्यक्षा चित्रा जगनाडे, राजयोगी भ्राता रामनाथ, राजयोगिनी ब्र.कु. गोदावरी दीदी, ब्र.कु. लाजवंती दीदी, ब्र.कु. प्रभा, ब्र.कु. मीनाक्षी



सीबीडी बेलापूर : महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना उपमहाव्यवस्थापक भ्राता मनीष भारद्वाज, सीईओ भ्राता जी. एल. करनानी, ब्र.कु. शीला व अन्य मान्यवर



पणजी : जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मंत्री भ्राता अटनासियो मोनसेरेट, महापौर भ्राता रोहित मोनसेरेट यांना ईश्वरी संदेश देताना ब्र.कु. शोभा



नागपूर : जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना जिल्हा न्यायाधीश रुपाली पवार, न्यायाधीश कीर्ती शहा, ब्र.कु. रजनी, ब्र.कु. सुनिता, ब्र.कु. मालती व अन्य